दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३४९ I शनिवार ०३ ऑक्टोबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## सीजेपीच्या आंदोलनात 'जय श्री रामा'च्या घोषणा शिवाजी पार्क परिसरात गोंधळ

**मुंबई :** दादरच्या शिवाजी पार्क परिसरात सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) आंदोलनात आता गोंधळाची स्थिती निर्माण झाल्याचं दिसतंय. अभिजीत दिपके यांच्याकडून सुरू असलेल्या आंदोलनात एका गटाने जय श्री रामाच्या घोषणा दिल्याने तणावाचं वातावरण निर्माण झालं.

ज्या कार्यकर्त्यांनी या घोषणा दिल्या त्यांना पोलिसांनी बाजूला नेल्याने अनुचित घटना घडली नाही. दरम्यान, घोषणा देणारे कार्यकर्ते हे कोणत्या पक्षाशी किंवा संघटनेशी संबंधित आहेत हे मात्र अद्याप स्पष्ट झालं नाही.देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा यासाठी कॉकरोच जनता पार्टीकडून शिवाजी पार्क परिसरात आंदोलन करण्यात आलं. यादरम्यान, भगवे मफलर घातलेले काही कार्यकर्ते या ठिकाणी आले आणि त्यांनी जय श्री रामाच्या घोषणा दिल्या. पोलिसांनी यावेळी सतर्कता दाखवत या कार्यकर्त्यांना बाजूला नेलं. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडली नाही.

# ४४ वर्षांनंतर भारतीय महिला हॉकीला सुवर्णकिरण

## चीनला १-० ने नमवून आशियाई क्रीडा स्पर्धेत नंबर वन वर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करत तब्बल ४४ वर्षांचा सुवर्णपदकाचा दुष्काळ संपवला. ऐची-नागोया येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी गतविजेत्या चीनचा १-० असा पराभव करत सुवर्णपदक पटकावले. या विजयासह भारताने २०२८च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी थेट पात्रताही मिळवली. १९८२ नंतर प्रथमच भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे.




**१९८२मध्ये दिल्ली येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला हॉकी संघाने सुवर्णपदक पटकावले होते. त्यानंतर अनेक वर्षे भारतीय संघाला या यशाची पुनरावृत्ती करता आली नव्हती. अखेर ४४ वर्षांनंतर चीनला अंतिम सामन्यात पराभूत करत भारताने पुन्हा एकदा आशियाई महिला हॉकीमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले.**

अंतिम सामन्यात भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत चीनवर दबाव निर्माण केला. सामन्याच्या दहाव्या मिनिटाला लालरेम्सियामीने केलेला गोल भारतासाठी निर्णायक ठरला. गोल झाल्यानंतर चीनने आक्रमणाची धार वाढवली. मात्र भारतीय बचावपटूंनी प्रत्येक हल्ला परतवून लावत आघाडी कायम ठेवली.

सामन्याच्या उत्तरार्धात चीनला बरोबरी साधण्याची मोठी संधी मिळाली. चीनला पेनल्टी स्ट्रोक मिळाल्यानंतर सामना १-१ करण्याची संधी होती. मात्र भारताची अनुभवी गोलरक्षक सविता पुनियाने शानदार बचाव करत चीनचा हा प्रयत्न हाणून पाडला. सविताच्या या बचावामुळे भारतीय संघाचा आत्मविश्वास वाढला. त्यानंतर चीनने सातत्याने भारतीय गोलक्षेत्रावर हल्ले चढविले; मात्र भारतीय बचावफळीने संयमी खेळ करत चीनला गोल करण्यापासून रोखले.सामन्याच्या अखेरच्या मिनिटांपर्यंत चीनने बरोबरीसाठी जोरदार प्रयत्न केले. भारतीय खेळाडूंनी मात्र बचावात कोणतीही चूक होऊ न देता १-०ची आघाडी कायम राखली. अखेर पंचांचा अंतिम शिट्टी वाजताच भारतीय खेळाडूंनी मैदानावर जल्लोष केला. ४४ वर्षांची प्रतीक्षा संपवत भारताच्या महिला हॉकी संघाने सुवर्णपदकाला गवसणी घातली.या विजयाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भारताला या सुवर्णपदकामुळे २०२८च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये थेट प्रवेश मिळाला आहे. त्यामुळे आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेतेपदासोबतच भारतीय महिला हॉकी संघासमोर आता ऑलिम्पिकचे मोठे लक्ष्य उभे राहिले आहे.

## प्रकाश आंबेडकरांना रामदास आठवलेंची थेट ऑफर

**'पक्षात प्रवेश करून अध्यक्षपद स्वीकारा; मी तुमच्यासोबत काम करण्यास तयार'**




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षांच्या ऐक्याचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. केंद्रीय मंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे अध्यक्ष रामदास आठवले यांनी वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत काम करण्याची तयारी दर्शवली आहे. आंबेडकर यांनी आपल्या पक्षात प्रवेश करून अध्यक्षपद स्वीकारावे, अशी थेट ऑफरही आठवले यांनी दिली.

अहिल्यानगर दौऱ्यावर असताना माध्यमांशी बोलताना आठवले यांनी रिपब्लिकन ऐक्याबाबत भूमिका स्पष्ट केली. प्रकाश आंबेडकर आणि रामदास आठवले एकत्र आल्याशिवाय रिपब्लिकन ऐक्य होणार नाही, अशी चर्चा असल्याचे सांगत त्यांनी आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची तयारी व्यक्त केली.

''प्रकाश आंबेडकर आणि रामदास आठवले एकत्र आल्याशिवाय रिपब्लिकन ऐक्य होत नाही, असे बोलले जाते. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांनी आमच्या पक्षात प्रवेश करून अध्यक्षपद भूषवावे. मी त्यांच्यासोबत काम करण्यास तयार आहे,'' असे आठवले म्हणाले.

आठवले यांच्या या प्रस्तावामुळे रिपब्लिकन राजकारणातील ऐक्याचा विषय पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रकाश आंबेडकर यांची भूमिका काय राहणार, याकडे लक्ष लागले आहे.

# जिल्हा बँकेच्या रणधुमाळीला सोमवारचा क्लायमॅक्स!

- ८४६ अर्जांची विक्री; १०९ उमेदवारी अर्ज दाखल
- राहाता-संगमनेरचा डाव अद्याप गुलदस्त्यात
- विखे-थोरातांच्या प्रभावक्षेत्राकडे लक्ष
- विखे-राम शिंदेंमधील दुरावा कायम?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीने जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापवले असून, ८४६ उमेदवारी अर्जांची विक्री आणि आतापर्यंत १०९ अर्ज दाखल झाले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आता केवळ सोमवारचा दिवस शिल्लक असल्याने या दिवशी मोठ्या राजकीय घडामोडी होण्याची शक्यता आहे. विशेषतः पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या राहाता आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या संगमनेरमधून अद्याप उमेदवारी अर्ज दाखल न झाल्याने या दोन्ही प्रभावक्षेत्रांतील राजकीय समीकरणांकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

भाजपमधील परस्पर विरोधी गटांचे नेतृत्व करणारे राधाकृष्ण विखे पाटील आणि विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे नुकतेच जामखेडमधील दुष्काळी आढावा बैठकीत एकाच व्यासपीठावर आले. मात्र जिल्हा बँकेच्या निवडणुकीबाबत दोघांमध्ये अद्याप चर्चा झालेली नसल्याचे समोर आले. विखे पाटील यांनी निवडणुकीवर बोलण्यास टाळले, तर राम शिंदे यांनीही यासंदर्भात विखे पाटील यांच्याशी चर्चा झाली नसल्याचे स्पष्ट केले.

सोमवारचा दिवस ठरणार निर्णायक; कोण माघार घेणार, कोणाला कोणाची साथ मिळणार आणि कोणत्या गटाची अंतिम मोट बांधली जाणार, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**प्रा. राम शिंदे नाराज नाहीत....**

'विखे-राम शिंदे यांच्यात नाराजी नाही,' असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊ द्यावी. अर्ज दाखल, छाननी आणि पुढील प्रक्रिया झाल्यानंतर चर्चेसाठी पुरेसा वेळ आहे. सहकारी संस्थांमध्ये राजकारण नको, अशी भूमिका त्यांनी मांडली.

**लंके-लहामटे समर्थक आमनेसामने; अखेर गळाभेट**

अर्ज दाखल करण्याच्या ठिकाणी खासदार नीलेश लंके आणि आमदार किरण लहामटे यांच्या समर्थकांमध्ये घोषणाबाजी झाली. वातावरण पाहून लंके यांनी 'जिंदाबादच्या घोषणा देऊ नका, हम तुम्हारे साथ है म्हणा,' असे मिश्कीलपणे सांगितल्याने हशा पिकला. त्यानंतर लंके आणि लहामटे यांनी गळाभेट घेतली.

**पती-पत्नी, पिता-पुत्र, चुलतभाऊ मैदानात**

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत कौटुंबिक राजकीय समीकरणांचेही दर्शन घडत आहे. माजी आमदार चंद्रशेखर घुले आणि त्यांच्या पत्नी राजश्री घुले, माजी संचालक राजेंद्र नागवडे व अनुराधा नागवडे, आमदार प्राजक्त तनपुरे व त्यांचे चुलतबंधू हर्ष तनपुरे, तसेच अंबादास पिसाळ व त्यांचे पुत्र तुषार पिसाळ यांनी अर्ज दाखल केले आहेत.

## जातीयवाचक ठरावाविरोधात पारनेर पोलिस ठाण्यासमोर धरणे

**रोकडे प्रकरणी कारवाईची मागणी; विविध सामाजिक संघटनांचा आंदोलनात सहभाग**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** दैठणे गुंजाळ विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळाने कर्मचारी सुरेश मालबा रोकडे यांच्याबाबत जातीयवाचक ठराव केल्याचा आरोप करत विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी शुक्रवारी पारनेर पोलिस ठाण्यासमोर जोरदार धरणे आंदोलन केले. संबंधित संचालक मंडळासह प्रकरणात दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

पारनेर पोलिस ठाण्यासमोर सकाळी ११ वाजता आंदोलनाला सुरुवात झाली. वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, रिपब्लिकन सेना, भीम शक्ती संघटना आणि आरपीआय युवा आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी सहकारी संस्थेच्या संचालक मंडळावर जातीय भेदभावाचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली.यावेळी आंदोलकांच्या शिष्टमंडळाने पारनेर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. संबंधित प्रकरणाबाबत पोलिस अधीक्षकांशी तातडीने चर्चा करून कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिवटे यांनी दिल्याचे आंदोलकांनी सांगितले. या निवेदनावर राजेंद्र करंदीकर, बाळासाहेब पातारे, हिरामण सोनवणे, किरण सोनवणे, अतुल भालेराव, काकासाहेब गुंजाळ, दादाभाऊ पटेकर, प्रल्हाद शिंदे, गणेश मगर, प्रदीप नगरे, अविनाश देशमुख, अजय साळवे, अशोक गुंजाळ, अंबादास जाधव, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

संबंधित ठरावाचा मजकूर उपलब्ध कागदपत्रे आणि प्रकरणाची वस्तुस्थिती तपासून पोलिसांकडून चौकशी करण्यात येणार आहे. चौकशीत तथ्य समोर आल्यानंतर कायद्यानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.



**आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, सुरेश मालबा रोकडे तसेच त्यांच्या समाजाचा सार्वजनिकरित्या अपमान व अवहेलना करणारा ठराव घेण्यात आला आहे. रोकडे यांना आपले म्हणणे मांडण्यासाठी आवश्यक कागदपत्रे देण्यास संचालक मंडळाने नकार दिल्याचा आरोपही करण्यात आला. त्यामुळे संबंधित संचालक मंडळावर नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करून ते बरखास्त करावे, अशी मागणी आंदोलकांनी केली.**

## शेवगावच्या हक्काचे पाणी कोणीही हिरावून घेणार नाही

**शेवगाव : प्रतिनिधी**

शेवगावच्या हक्काचे पाणी कोणीही हिरावून घेणार नाही. ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या पहिल्या टप्प्यातील उर्वरित आठ आणि दुसऱ्या टप्प्यातील २२ गावांना पाणी देताना कोणावरही अन्याय होऊ नये, यासाठी तिसरा टप्पा सुरू करण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. या टप्प्याच्या सर्वेक्षणासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, पुढील तीन महिन्यांत सर्वेक्षण पूर्ण करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले आहेत, अशी माहिती जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.शेवगाव येथे मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत टंचाई आढावा बैठक झाली. आमदार मोनिका राजळे, अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता अरुण नाईक, अभियंता सुनंदा जगताप, पल्लवी जगताप, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विविध विभागांचे **(पान ४ वर)**



## कोपर्डी निर्भया हत्याकांड : फाशीच्या शिक्षेवरील सुनावणी अंतिम टप्प्यात

### उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची घटनास्थळाची पाहणी

**साक्षीदारांची ठिकाणे, भौगोलिक परिस्थिती आणि आरोपींच्या हालचालींचा घेतला आढावा**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या कोपर्डी येथील १५ वर्षीय मुलीवरील बलात्कार व हत्याकांडातील उर्वरित दोन दोषींच्या फाशीच्या शिक्षेवरील अपीलाची सुनावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती आशिष चव्हाण यांनी शुक्रवारी (२ ऑक्टोबर) कोपर्डी येथे प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी केली. न्यायालयीन प्रक्रियेतील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. न्यायमूर्तींनी तब्बल एक तास घटनास्थळाची पाहणी करून परिसराची भौगोलिक रचना, साक्षीदारांची ठिकाणे, तेथून दिसणारे दृश्य तसेच आरोपींच्या संभाव्य हालचाली याबाबत प्रत्यक्ष माहिती घेतली. यावेळी पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि तत्कालीन तपासी अधिकारी उपस्थित होते. न्यायालयीन पाहणीदरम्यान कमालीची गुप्तता पाळण्यात आली असून पत्रकारांना घटनास्थळी प्रवेश देण्यात आला नाही. १३ जुलै २०१६ रोजी कोपर्डी येथे ही घटना घडली होती. प्रकरणात जितेंद्र शिंदे, नितीन भैलुमे आणि संतोष भवाळ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. नोव्हेंबर २०१७ मध्ये अहिल्यानगर जिल्हा सत्र न्यायालयाने तिन्ही आरोपींना फाशीची शिक्षा सुनावली होती. त्याविरोधात दोषींनी मुंबई उच्च न्यायालयात अपील केले. दरम्यान, मुख्य आरोपी जितेंद्र शिंदे याचा सप्टेंबर २०२३ मध्ये येरवडा कारागृहात मृत्यू झाला. नितीन भैलुमे आणि संतोष भवाळ यांच्या फाशीच्या शिक्षेच्या पुष्टीकडे राज्याचे लक्ष लागले आहे. न्यायालयाच्या घटनास्थळ पाहणीमुळे प्रकरणातील अंतिम निकालाच्या प्रक्रियेला महत्त्व प्राप्त झाले आहे.

# संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला तीन आयएपी एक्सलन्स पुरस्कार

पुणे : संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीने इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्सच्या (आयएपी) एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत तीन प्रतिष्ठित पुरस्कार पटकावले. नवी दिल्लीतील यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटर येथे झालेल्या विशेष समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार मिळाला. तसेच संचेती इन्स्टिटट्यूट फॉर ऑर्थोपेडिक्स अँड रिहॅबिलिटेशनला 'टेक्नोलॉजी इंटीग्रेटेड सेंटर' आणि 'स्पेशलाइज्ड ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन सेंटर' असे दोन पुरस्कार मिळाले. आयएपीचे अध्यक्ष डॉ. संजीव झा यांच्या हस्ते संचेती हेल्थकेअर अकॅडमीच्या अध्यक्ष मनीषा संघवी आणि प्राचार्या डॉ. राधा



भट्टड यांनी पुरस्कार स्वीकारले.

सुमारे ७० वर्षांची परंपरा असलेल्या आयएपीतर्फे शिक्षणातील गुणवत्ता, वैद्यकीय क्षेत्रातील नावीन्य आणि संशोधनातील योगदानाची दखल घेत हे पुरस्कार दिले जातात. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष रुग्णसेवेचा अनुभव, आधुनिक पुनर्वसन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आणि संशोधनासाठी प्रोत्साहन दिले जाते. या यशाबद्दल मनीषा संघवी यांनी संस्थेतील प्राचार्य, प्राध्यापक, वैद्यकीय तज्ज्ञ, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या सामूहिक योगदानाचे कौतुक केले.

# पिकांचे पंचनामे करतांना पैसे मागणाऱ्याचे नाव कळवा : रामदास गोल्हार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शिवसेनेचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने महाराष्ट्रात ठिकठिकाणी उबाठा शिवसेनेच्या वतीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा तालुक्यातील कुकाणा येथे दुष्काळग्रस्तांसाठी मदत केंद्र सुरू करण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतीत नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करतांना पैसे मागणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव आम्हाला कळवा असे आवाहन शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार यांनी केले.

या मदत केंद्राचे उद्घाटन शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलतांना रामदास गोल्हार म्हणाले की राज्यात दुष्काळी परिस्थिती असतांना शासनाने शेतकऱ्यांना हेक्टरी मदत देण्याचे जाहीर केले आहे त्यात अहिल्यानगर जिल्ह्याचा समावेश आहे, शेतकऱ्यांना फॉर्म भरून मार्गदर्शन करणे हा मदत केंद्राचा मुख्य उद्देश असून यासाठी आमचे सर्व पदाधिकारी शिवसैनिक हे



मदत करतील. या मदत केंद्राचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार यांनी केले.

गोल्हार म्हणाले, शिवसेनेच्या वतीने सुरू करण्यात आलेले शेतकरी मदत केंद्राची सेवा विनामुल्य आहे.शेतकरी बांधवांसाठी आपल्या नुकसान झालेल्या पिकाची तपशिलवार माहिती फॉर्म भरतेवेळी येथे द्यावी, आपणाकडे बैल, गाय, म्हशी व जे पशुधन आहे ते फॉर्ममध्ये नमुद करावे, पिक विमा भरलेला असेल तर त्याची पावतीची झेरॉक्स प्रत फॉर्म सोबत जोडावी, पिण्याच्या पाण्याची टंचाई असेल तर तसे फॉर्म मध्ये नमुद करावे, आपल्या पिकाचा शासकिय अधिकाऱ्यांकडुन पंचनामा झाला असेल / अगर नसेल आपण शेतकरी मदत केंद्रांत फॉर्म भरुन द्यावेत असे आवाहन रामदास गोल्हार यांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या मदत केंद्र शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी मच्छिंद्र म्हस्के,रामानंद मुंगसे, बाबासाहेब गोल्हार, किसनराव कावरे, खंडेराव कचरे, अंबादास खराडे, रामदास खराडे, जावेद शेख, पत्रकार अनिल गर्जे, राहूल जावळे, नितिन निकम, शेतकरी लहू खाटीक, अक्षय कानडे, प्रफुल कचरे, बाबुराव म्हस्के, अण्णासाहेब वाघुले यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कुकाणा शिवसेना शाखा प्रमुख राजेंद्र राऊत यांनी आभार मानले.

# पंढरपुरात रविवारी चौथी राष्ट्रीय केळी परिषद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई:** केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून ठोस उपाययोजना सुचविण्यासाठी केळी उत्पादक शेतकरी संघ महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय बनाना महासंघ यांच्या वतीने चौथी राष्ट्रीय केळी परिषद रविवारी (दि. ४) पंढरपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. वाखरी रोडवरील आनंदी विनायक मंगल कार्यालयात सकाळी ९ वाजता परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. संघाचे संस्थापक अध्यक्ष किरण चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिमली.

केळी उत्पादकांसमोर नैसर्गिक आपत्ती, अतितापमान, वादळी वारे, गारपीट, अतिवृष्टी व दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांसह पिकविमा, हमीभाव, बाजारपेठ, निर्यात, प्रक्रिया उद्योग आणि उत्पादन खर्चाचे प्रश्न गंभीर आहेत. या पार्श्वभूमीवर केळीचा शालेय पोषण आहारात समावेश, एफपीओंना थेट मदत, विशेष आर्थिक पॅकेज, केळीला



हमीभाव, संशोधन केंद्राची स्थापना, प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन तसेच देशांतर्गत व निर्यात बाजारपेठ वाढविण्याबाबत परिषदेत चर्चा होणार आहे.

परिषदेचे उद्घाटन मध्य प्रदेश अखिल भारतीय बनाना महासंघाचे राज्याध्यक्ष हेमंत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. केळी तज्ज्ञ शरद विस्पुते, डॉ. प्रकाश सावंत, सचिन वाघमोडे यांचे विविध विषयांवर मार्गदर्शन होणार आहे. परिषदेस केळी उत्पादकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन किरण चव्हाण व पुरुषोत्तम सर्जे यांनी केले आहे.

# साईंच्या लाडू प्रसाद काउंटरचे उद्घाटन

शिर्डी : येथे देश-विदेशातून येणाऱ्या लाखो साईभक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री साईबाबा संस्थानच्या वतीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. नगर-मनमाड महामार्गालगत नव्याने सुरू झालेल्या सबका मालिक एक मार्केट परिसरातील जागेत लाडू प्रसाद काउंटरची सुविधा भाविकांसाठी सुरू करण्यात आली आहे. या सुविधेमुळे शिर्डीत येणाऱ्या भाविकांना साईबाबांचा प्रसाद घेणे आता अधिक सोयीचे आणि सुलभ होणार आहे. श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांच्या निर्देशानुसार ही सुविधा सुरू करण्यात आली असून, या लाडू प्रसाद काउंटरचे औपचारिक उद्घाटन शिर्डी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात यांच्या हस्ते आज संपन्न झाले. उद्घाटन प्रसंगी शिर्डी शहरातील मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती होती. यावेळी उपनगराध्यक्ष अभय शेळके यांच्यासह सर्व नगरसेवक, श्री साईबाबा संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी प्रज्ञा महांडुळे, अतुल वाघ, लाडू प्रसाद निर्मिती विभाग प्रमुख रविंद्र गायके तसेच शिर्डी नगरपरिषद व साईबाबा संस्थानचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगर-मनमाड महामार्गालगत मुख्य रस्त्यावर ही सुविधा सुरू झाल्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या तसेच प्रसादालयाच्या दिशेने ये-जा करणाऱ्या साईभक्तांना लाडू प्रसाद खरेदी करणे अधिक सोयीचे होणार आहे.



# एनडीआरएफच्या आधी राज्य सरकार शेतकऱ्यांना भरघोस मदत करणार: मंत्री विखे पाटील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** निवडणूक आयोगाच्या विरोधात ठाकरे बंधूंचे आंदोलन म्हणजे गमावलेली पक्षाची पत पुन्हा मिळवण्यासाठी सुरू केलेली केविलवाणी धडपड आहे; जे केजरीवाल बोलतात तेच सीजेपी बोलत असल्याने हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात पुरस्कृत केलेले आंदोलन आहे, अशी टीका जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.

माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, दिल्लीतील आंदोलनानंतर संपूर्ण देशात लोकप्रियता वाढेल, असा सीजेपीचा झालेला भ्रम आता दूर झाला असेल. जे केजरीवाल बोलतात तेच सीजेपीचे आंदोलक बोलतात. त्यामुळे हे पुरस्कृत केलेले आंदोलन फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाला बदनाम करण्यासाठीच सुरू असल्याचे विखे पाटील म्हणाले.

आंदोलनात वेळ घालवण्यापेक्षा सरकारच्या खांद्याला खांदा लावून मदत करण्यासाठी पुढे आलात, तर शेतकरी तुम्हाला दुवा देतील. पण यांना काहीच करायचे नाही. हे कोणतीही मदत शेतकऱ्यांना करू शकणार नाहीत. कोविडच्या संकटात शेतकऱ्यांना हे काही देऊ शकले नाहीत, तर आता काय देणार? असा सवाल मंत्री वखे पाटील यांनी केला.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सर्व मंत्री बांधावर जाऊन शेतकऱ्यांना आधार देत आहेत. महायुती सरकार हे देणारे सरकार असल्याने शेतकऱ्यांना मदत करण्यात कुठेही कमी पडणार नाही. एनडीआरएफच्या आधी राज्य सरकार भरघोस मदत करेल, अशी ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली.

# आशियाई सुवर्णविजेत्या अस्लम इनामदारांचा गौरव



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** गरिबी,कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत भारतीय कबड्डीमध्ये स्वतः ची ओळख निर्माण करणारे टाकळीभानचे सुपुत्र अस्लम इनामदार यांचा माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा तथा महाराष्ट्र कृषक समाजाच्या अध्यक्षा अनुराधा पुष्पलता गोविंदराव आदिक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संघर्षातून आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलेल्या अस्लम यांच्या प्रेरणादायी प्रवासाचा यावेळी गौरव करण्यात आला.

टाकळीभान म्हणजे कबड्डीची पंढरीच आहे, असे सांगत अनुराधा आदिक यांनी गावाच्या कबड्डी परंपरेचे कौतुक केले. टाकळीभान गावाने महाराष्ट्राला अनेक उत्कृष्ट कबड्डीपटू दिले असून, अस्लम इनामदार यांनी आपल्या कामगिरीच्या जोरावर गावाचे नाव देशपातळीवर पोहोचविले असल्याचे त्यांनी नमूद केले. २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष कबड्डी संघाने सुवर्णपदक पटकावले. या ऐतिहासिक विजयात अस्लम इनामदार यांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. सामान्य कुटुंबातील मुलापासून ते देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आंतरराष्ट्रीय खेळाडूपर्यंतचा त्यांचा प्रवास अनेक तरुणांना
प्रेरणा देणारा आहे.

कठीण परिस्थितीतही जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर यश मिळविता येते, हे अस्लम यांनी आपल्या क्रीडा प्रवासातून सिद्ध केले आहे. त्यांच्या यशामध्ये त्यांच्या आईंचे योगदान मोठे असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. ''अस्लम यांच्या कामगिरीचा आम्हा सर्व श्रीरामपूरकरांना अभिमान आहे,'' असे अनुराधा आदिक यांनी सांगितले. यावेळी जाकीराभाभी इनामदार, कौसर इनामदार, बापूसाहेब पटारे, राजेंद्र कोकणे, जयकर मगर, अर्जुन राऊत, सुभाष पटारे, गजानन कोकणे, राहुल कोकणे, मधुकर गायकवाड, आदित्य आदिक आदी मान्यवर उपस्थित होते.

# स्वच्छ राहुरीसाठी नागरिकांचे श्रमदान

## उघड्यावर कचरा टाकल्यास दंड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी:** राहुरी नगरपरिषदेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा, सेवा संकल्प अभियान' अंतर्गत १ ऑक्टोबर रोजी 'एक दिवस, एक तास, एक साथ' हा विशेष स्वच्छता उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. शनी चौक ते नवीपेठ परिसर तसेच नगर-मनमाड रस्त्यालगत सामूहिक स्वच्छता मोहीम राबवून नगरपरिषद कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर श्रमदान केले.



सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे, नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे आणि स्वच्छ, सुंदर व हरित राहुरीसाठी लोकसहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. मोहिमेत नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, गटनेते हर्षदादा तनपुरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, नगरसेवक-नगरसेविका, मुख्याधिकारी विद्या पाटील, स्वच्छता आरोग्य अधिकारी भाऊसाहेब ढोकणे, नगरपरिषद कर्मचारी, आरोग्य विभागातील स्वच्छता कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

यावेळी नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे म्हणाले, स्वच्छ व सुंदर राहुरी राखणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिकाने स्वतःहून पुढाकार घेऊन स्वच्छतेचा संकल्प करावा. मुख्याधिकारी विद्या पाटील यांनी स्वच्छता व आरोग्याचे महत्त्व स्पष्ट करताना उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला. दुकानदार, आस्थापना किंवा संस्था उघड्यावर कचरा टाकताना आढळल्यास कोणतीही गय न करता दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या अभियानामुळे शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण झाली असून, स्वच्छ राहुरीसाठी नागरिकांचा सहभाग वाढण्यास मदत झाली.

# शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून आ. कोल्हेंनी केली दुष्काळाची पाहणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आमदार विवेक कोल्हे यांनी तहसीलदार महेश सावंत यांच्यासमवेत तालुक्याच्या पूर्व भागातील आपेगाव, तिळवणी यासह विविध गावांमध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. पावसाअभावी पिकांचे झालेले नुकसान, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांच्या



अडचणींची त्यांनी प्रत्यक्ष माहिती घेतली. कोपरगाव तालुका दुष्काळग्रस्त यादीत जाहीर झाल्यानंतर दुष्काळाची तीव्रता जाणून घेण्यासाठी आ. कोल्हे यांनी शेतशिवारात पाहणी केली. यावेळी अनेक ठिकाणी पाण्याअभावी पिके करपल्याचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. सुरू असलेले पिकांचे पंचनामे कोणताही विलंब न करता तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष नुकसान पंचनाम्यात अचूकपणे नोंदविले जावे. एकही नुकसानग्रस्त शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहू नये, याची प्रशासनाने काळजी घ्यावी, असे आ. कोल्हे यांनी सांगितले. दुष्काळामुळे आगामी काळात पाणी, चारा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता असल्याने गावनिहाय नियोजन करून उपाययोजना करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

# लग्नाच्या आमिषाने चार लाखांची फसवणूक

## नवरी साथीदारांसह पोलिसांच्या ताब्यात

राहुरी : तालुक्यातील चिंचोली फाटा येथील एका तरुणाला लग्नासाठी मुलगी दाखवून त्याच्याकडून चार लाख रुपये रोख घेत फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुंबई येथील एका तरुणीचे संबंधित तरुणाशी लग्न लावून देण्यात आले. मात्र, लग्नानंतर महिनाभरातच तरुणीचे यापूर्वी लग्न झाले असून तिला चार मुले असल्याचे समोर आले. या प्रकारानंतर नवरदेव व त्याच्या नातेवाईकांनी तरुणी व तिच्या साथीदारांना पकडून राहुरी पोलिसांच्या ताब्यात दिले.

चिंचोली फाटा येथील संबंधित तरुण लग्नासाठी मुलीच्या शोधात होता. त्यावेळी मुंबई येथील एका एजंट महिलेने त्याला एका तरुणीचे स्थळ दाखविले. या लग्नासाठी एजंट महिलेने नवरदेवाकडून चार लाख रुपये रोख घेतल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर सुमारे महिनाभरापूर्वी दोघांचे लग्न लावून देण्यात आले.

लग्नानंतर नवरी तरुणी नवरदेवाच्या घरी राहू लागली. मात्र, तिच्या वर्तणुकीमुळे कुटुंबीयांना संशय आला. चौकशीत सदर तरुणीचे यापूर्वीच लग्न झाले असून तिला चार मुले असल्याची माहिती समोर आली. तसेच तिला दारू व गुटखा सेवनाचे व्यसन असल्याचेही उघड झाल्याचे सांगण्यात येत आहे. आपली फसवणूक करून चार लाख रुपये घेतल्याचे लक्षात आल्यानंतर नवरदेव व त्याच्या नातेवाईकांनी तरुणी व तिच्या साथीदारांना पकडले.

दि. २ ऑक्टोबर रोजी दुपारी त्यांना राहुरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे, तसेच फसवणुकीची टोळी किती मोठी आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. रात्री उशिरापर्यंत राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

दरम्यान, लग्नासाठी मुली मिळत नसल्याचा गैरफायदा घेत काही टोळ्या तरुणांची आर्थिक फसवणूक करीत असल्याची चर्चा आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून अशा प्रकारे फसवणूक करणाऱ्या टोळ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# ४९५ श्री सदस्यांनी घेतला स्वच्छतेचा वसा

## १२ किलोमीटर रस्त्यांची स्वच्छता; ९६०० किलो कचरा संकलित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत 'स्वच्छता ही सेवा' उपक्रम राबविण्यात आला. महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित महास्वच्छता अभियानात ४९५ श्री सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत १२ किलोमीटर रस्ते व परिसराची स्वच्छता केली. या मोहिमेत तब्बल ९६०० किलो कचरा संकलित करण्यात आला. विशेष म्हणजे, महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी स्वतः श्री सदस्यांसोबत स्वच्छता करत कचरा उचलला. यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले, स्वच्छतेबाबत नागरिकांची मानसिकता बदलणे आणि जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. अनेक नागरिक घर स्वच्छ ठेवतात; मात्र घराबाहेरील परिसरात कचरा टाकतात. ओला व सुका कचरा वेगळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याची सवय



नागरिकांनी लावून घ्यावी. रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची गरज असून, सीसीटीव्हीच्या माध्यमातून कचरा टाकणाऱ्यांचा शोध घेऊन कारवाई करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारून स्वयंशिस्त लावून घ्यावी. लहान मुलांमध्येही स्वच्छतेच्या सवयी रुजविणे आवश्यक आहे. शहरात घंटागाडीची सुविधा उपलब्ध असून नागरिकांनी कचरा त्यातच टाकावा. स्वच्छतेची लोकचळवळ उभी करून अहिल्यानगर शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन जगताप यांनी केले. महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, स्वच्छतेची जबाबदारी केवळ शासन आणि प्रशासनाची नसून प्रत्येक नागरिकाची आहे. संत गाडगेबाबांनी स्वच्छतेचा संदेश दिला असून, तो पुढे नेण्याची जबाबदारी सर्वांची आहे. स्वच्छता ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे. आयुक्त यशवंत डांगे यांनी प्रत्येकाने आपल्या परिसरासाठी एक दिवस, एक तास स्वच्छतेसाठी द्यावा, असे आवाहन केले. प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांनी कोणत्याही आदेशाची वाट न पाहता स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. प्रतिष्ठानचे प्रफुल्ल काळे यांनी सांगितले की, सकाळी सात वाजता ४९५ श्री सदस्यांनी विविध भागांत स्वच्छता सुरू केली. सामाजिक कर्तव्य म्हणून हे अभियान राबविण्यात आले. मोहीम संपल्यानंतर आयुक्त डांगे यांनी पायी जाणाऱ्या श्री सदस्यांना स्वतःच्या वाहनातून कार्यक्रमस्थळी नेले. त्यांच्या या कृतीचे श्री सदस्यांनी कौतुक केले. यावेळी मनपा अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता सेवक आणि प्रतिष्ठानचे श्री सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## तेजल कराड उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना



**राहुरी** : येथील अरुण कराड यांची नात व अतुल कराड यांची कन्या तेजल अतुल कराड ही पुढील उच्च शिक्षणासाठी न्यूयॉर्क, अमेरिका येथे रवाना होत आहे. तिच्या या शैक्षणिक वाटचालीबद्दल राहुरी फॅक्टरी परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विविध स्तरांतून तिला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत. तेजल कराड हिने राहुरी फॅक्टरी येथील डी. पॉल स्कूलमध्ये प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर तिने पुढील शिक्षण पुणे येथील आबासाहेब गरवारे महाविद्यालय येथे व नंतर मनीपाल विद्यापीठ कर्नाटक येथे शिक्षण घेतले. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करत तिने आता उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठ (आय. व्ही.लीग) येथे एम.एस (क्लायमॅट) हे शिक्षण घेण्यासाठी रवाना झाली आहे. तेजलच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच नागरिकांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## आत्मा मालिक कुस्ती केंद्राची शालेय ज्युडो स्पर्धेत विक्रमी कामगीरी



**कोपरगाव** : जिल्हास्तरीय शालेय ज्युडो स्पर्धेत आत्मा मालिक कुस्ती केंद्रातील विद्यार्थ्यांनी सुवर्ण व रौप्य पदकांची लयलुट करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या विद्यार्थ्यांनी तब्बल तेरा सुवर्ण व चौदा रौप्य पदकांची कमाई करीत विक्रमी कामगीरी केली. त्रिमुर्ती पावन प्रतिष्ठान मध्ये या स्पर्धा संपन्न झाल्या. क्रीडा व युवक संचलनालय व जिल्हा क्रिडा कार्यालयाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सुवर्णपदक विजेत्यांची येत्या चार ऑक्टोबर रोजी सोलापूर येथे होणार्या पुणे विभागीय शालेय ज्युडो स्पर्धेसाठी निवड झाली. विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, आत्मा मालिक कुस्ती केंद्राचे संचालक व भरत नायकल त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षक विवेक नायकल, प्रशिक्षक राजू पाटील आणि अक्षय डांगे यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

## म फु कृषी विद्यापीठात महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता अभियान



**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके व विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा गांधी जयंती व भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी काष्टी, मालेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. महानंद माने, कृषी तंत्रज्ञान शिक्षण विभागाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र हिले, उपकुलसचिव (प्रशासन) स्वाती निकम, उपकुलसचिव (विद्या) विजय पाटील, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सचिन सदाफळ व सहाय्यक कुलसचिव (का.व्य.) महेश घाडगे उपस्थित होते. यावेळी म.फुले कृषी विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व पदुत्तर महाविद्यालयातील व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनीं यांनी महात्मा फुले पुतळा परिसर, प्रशासकीय इमारत परिसर, वसतीगृहे, डॉ. नानासाहेब पवार सभागृह परिसर, ग्रंथालय परिसर व महाविद्यालयांच्या परिसरामध्ये स्वच्छता केली.

# बिझनेस एक्स्पोमधून विकसित भारताची पायाभरणी : ना. विखे पाटील

## १७५ स्टॉलमधून विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक दृष्टिकोनाचे दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : विद्यार्थ्यांना व्यवसायाची संकल्पना, बाजारपेठेचा अभ्यास आणि ग्राहकांच्या गरजा समजून घेण्याची संधी देणारा 'बिल्डिंग प्रवरा' उपक्रम त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणारा असून, अशा उपक्रमातून विकसित भारताची पायाभरणी होत आहे, असे प्रतिपादन जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने 'बिल्डिंग प्रवरा' संकल्पनेतून आयोजित बिझनेस एक्स्पोला ना. विखे पाटील तसेच माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या उपक्रमांचे कौतुक केले.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून सलग तिसऱ्या वर्षी हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.



एक्स्पोमध्ये सुमारे १७५ स्टॉल उभारण्यात आले असून, सौरऊर्जा, स्वदेशी उत्पादने, अन्नतंत्रज्ञान, सेंद्रिय उत्पादने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, खाद्यपदार्थ, हस्तकला, सजावटीच्या वस्तू यांचे प्रदर्शन व विक्री करण्यात आली आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पणत्या, रांगोळ्या, कपडे, सजावटीचे साहित्य, सेंद्रिय उदबत्त्या, धूप यांसह विविध घरगुती वस्तूंना ग्राहकांचा प्रतिसाद मिळत आहे. कृषी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी फळभाज्या, फुलझाडे आणि विविध रोपांच्या विक्रीला प्राधान्य दिले आहे. सेंद्रिय गूळ, गावरान तूप, दूध उत्पादनासाठी उपयुक्त खाद्यपदार्थ तसेच घरगुती व्यवसायातून तयार केलेल्या वस्तूंनाही पसंती मिळत आहे. ना. विखे पाटील यांनी प्रत्येक स्टॉलला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उत्पादनाची संकल्पना, बाजारपेठ, विक्रीचे नियोजन आणि भविष्यातील व्यवसायाच्या संधी याबाबत त्यांनी माहिती घेतली. काही उत्पादनांची स्वतः खरेदीही केली. विद्यार्थ्यांचा सहभाग आणि त्यांच्या व्यवसाय संकल्पना अभ्यासपूर्ण असल्याचे सांगत त्यांनी आयोजनाचे कौतुक केले.

आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देण्याच्या दिशेने स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. रविवारपर्यंत सुरू असलेल्या 'बिल्डिंग प्रवरा' उपक्रमास भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी केले.

### प्रवेशद्वारावरील देखावे आकर्षण

बिझनेस एक्स्पोच्या प्रवेशद्वारावर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा जीवनपट साकारण्यात आला आहे. तसेच 'विकसित भारत' संकल्पनेवर आधारित 'विकसित प्रवरा' हा देखावाही लक्षवेधी ठरत आहे. यावेळी प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एन. मगरे, नंदूशेठ राठी, सुनील जाधव, भारत घोगरे, डॉ. शिवानंद हिरेमठ यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## ग्रामीण खेळाडू जिद्दीने इतिहास घडवत आहेत : पालकमंत्री विखे पाटील



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : आशियाई क्रीडा स्पर्धेत कबड्डी खेळात दुसऱ्यांदा सुवर्णपदक मिळविलेल्या अहिल्यानगरचा भूमिपुत्र अस्लम इनामदार याची खेळातील कारकीर्द सुवर्णविजयी आणि सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याची प्रतिक्रिया जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली. श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभानचा भूमिपुत्र अस्लम इनामदार याने आशियाई क्रीडा स्पर्धेत कबड्डी संघामध्ये प्रतिनिधित्व करून सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावण्याचा मान मिळविला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अस्लम इनामदार याचा लोणी येथे सत्कार करून त्याचे विशेष अभिनंदन केले. या प्रसंगी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्यासह अस्लमचे नातेवाईक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## सभासदांची कर्जमाफी झाल्याशिवाय उंबरे संस्थेची निवडणूक घेऊ नये : ढोकणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**उंबरे** : राहुरी तालुक्याच्या पूर्व भागात असलेल्या उंबरे विविध कार्यकारी सेवा संस्थेची वार्षिक साधारण सभा संपन्न झाली . सभेच्या अध्यक्षस्थानी प्रशासक असलेले आर जी ढवळे हे होते , तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर तनपुरे कारखान्याचे माजी चेअरमन नामदेवराव ढोकणे पाटील, पंचायत समितीचे माजी सदस्य सुनील भाऊ आडसुरे , संस्थेचे माजी चेअरमन भाऊराव ढोकणे, कारभारी ढोकणे आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावरून बोलतानी नामदेवराव ढोकणे पाटील म्हणाले की, सध्या शासनाकडून कर्जमाफी योजना सुरू असून संस्थेच्या काही सभासदांची कर्जमाफी झाली असली तरी अजूनही बऱ्याच शेतकऱ्यांची नावे कर्जमाफी मध्ये न आल्याने ते अजून थकबाकीदार आहेत त्यामुळे ते मतदानापासून वंचित राहणार आहेत , तसेच सहकार कायद्यानुसार थकबाकीदार सभासदांना मतदानाचा अधिकार नाही, त्यामुळे संस्थेचे हितचिंतक असलेले जे मूळ सभासद हे मतदानापासून वंचित राहु नये म्हणून , उंबरे संस्थेच्या सर्व सभासदांची कर्जमाफी पूर्ण झाल्यावर आणि त्यांची नावे मतदार यादी मध्ये समाविष्ट झाल्यावरच संस्थेची निवडणूक घ्यावी यावर सांगोपांग चर्चा झाल्यानंतर सर्वानुमते हा ठराव संमत करण्यात आला.

यावेळी भाऊ सासवडे, नारायण ढोकणे, सोपान दुशिंग, विलास ढोकणे, राधाकिसन दुशिंग, बाबुराव पटारे , पिनू पटारे, मेजर पटारे, दत्तात्रय ढोकणे, बबनराव ढोकणे, मोहन ढोकणे यांच्यासह संस्थेचे सभासद, सर्व कर्मचारी उपस्थित होते.

कारभारी ढोकणे यांनी उपस्थिताचे आभार मानले.

### दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शासनाने शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करावी - सुनील आडसुरे

सध्याच्या परिस्थितीत सहकार टिकवणे हे मोठे जिकरीचे काम झाले असून काटकसरीने कारभार करून सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हितासाठी संस्थेने पुरक व्यवसाय सुरू करून उत्पादन वाढीचा प्रयत्न करावा तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यावर मोठे संकट उभे ठाकले आहे, त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना आधार द्यावा असे आवाहन सुनील आडसुरे यांनी केले आहे.

# राहुरी तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ५२ संघांचा सहभाग; विजेत्यांना पारितोषिक वितरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांमध्ये सहभागी व्हावे. खेळामुळे शरीर सुदृढ व लवचिक राहण्यास मदत होते, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र उंडे यांनी केले. अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय व राहुरी तालुका क्रीडा समितीच्या संयुक्त विद्यमाने देवळाली प्रवरा येथे तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत विविध शाळा व महाविद्यालयांतील ५२ संघांनी सहभाग नोंदविला. विविध वयोगटांतील सामन्यांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले.

पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रविंद्र ढुस होते. यावेळी राहुरी तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष नितीन घोलप, राजेंद्र उंडे, अशोक कदम, प्राचार्य मकरंद रायते, गणेश म्हसे, अभयसिंह पाटील, धनू करपे, प्रा. बाळासाहेब शेळके, प्रा. रितेश माळवदे, प्रा. अभिषेक शिंदे, प्रा. इरफान शेख, डॉ. संभाजी माने, विशाल ठुबे, बाबासाहेब जाधव, किशोर शिंदे आदी उपस्थित होते.

१९ वर्षांखालील मुलींमध्ये आरडगाव येथील तक्षज्ञ उच्च माध्यमिक विद्यालय, तर मुलांमध्ये देवळाली प्रवरा येथील श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय विजेते ठरले. १७ वर्षांखालील मुली व मुलांमध्ये शासकीय आश्रमशाळा, कोळेवाडीने प्रथम क्रमांक मिळविला.

१४ वर्षांखालील मुलींमध्ये शासकीय आश्रमशाळा, कोळेवाडी, तर मुलांमध्ये जनार्दन काळे माध्यमिक विद्यालय, चिंचोली फाटा विजेते ठरले. विजेत्यांना राजेंद्र उंडे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. गणेश भांड यांनी केले.

# शेतकरी कुटुंबातील ओमकार बोस्तेची भूमी अभिलेख विभागात निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : अजितदादा पवार कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकमधून २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विद्युत अभियांत्रिकी विभागातून पदविका पूर्ण केलेल्या ओमकार अनिल बोस्ते याची भूमी अभिलेख विभागात सर्वे अभियंता म्हणून निवड झाली असून, पारनेर कार्यालयात त्याची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याच्या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच ग्रामीण विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या व्यावसायिक संधी अधोरेखित झाल्या आहेत. ओमकार हा सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी असून, त्याचे वडील शेती व्यवसाय करतात. प्रतिकूल परिस्थितीतही मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने पदविका शिक्षण पूर्ण करून शासकीय सेवेत प्रवेश मिळविला. त्याचे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. या यशाबद्दल संस्थेचे संचालक डॉ. बाळासाहेब पवार यांनी ओमकारचे अभिनंदन करून योग्य मार्गदर्शन, सातत्य आणि मेहनतीच्या जोरावर ग्रामीण विद्यार्थीही शासकीय सेवेत यश मिळवू शकतात, असे सांगितले. संचालक दिलीप पवार, श्रीकांत पवार, प्राचार्या पूनम बोधक आणि विद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख मुस्कान खान यांनीही त्याचे कौतुक केले. महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्याला शुभेच्छा दिल्या. तर महात्मा गांधी जयंतीनिमित्त अजितदादा पवार कॉलेज तर्फे बसस्थानक आणि वडाळा महादेव येथील महादेव मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी परिसरातील कचरा, प्लास्टिक व घाण गोळा करून स्वच्छता केली. स्वच्छतेबाबत जनजागृती करत विद्यार्थ्यांनी नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकण्याचे आवाहन केले. प्रथम वर्ष विभागप्रमुख प्रा. सुनील खिलारी व प्रा. पंकज कोर्डे यांनी उपक्रमासाठी परिश्रम घेतले. शिवा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, संचालक दिलीपदादा पवार व प्राचार्या पूनम बोधक यांच्या मार्गदर्शनाखाली अभियान पार पडले.

# त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : पाचशे विद्यार्थ्यांचा मॅरेथॉनमध्ये सहभाग, ओम महानोरने पटकावला प्रथम क्रमांक राष्ट्रपिता महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री, ग्रंथराज ज्ञानेश्वरी जयंतीचे औचित्य साधून नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या वतीने संस्थापक मेजर साहेबराव घाडगे साहेबांच्या प्रेरणेने आयोजित मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



छाया- सुधीर चव्हाण, नेवासा

सुमारे अकरा किलोमीटर अंतराच्या या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सुमारे पाचशे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्रिमूर्ती एन.डी. ए.विंगचे संचालक निवृत्त कर्नल के पी. सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्रिमूर्ती ओम महानोरने मॅरेथॉन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, त्रिमूर्ती पब्लिक स्कूल व त्रिमूर्ती इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणातून सुरू झालेल्या या स्पर्धेच्या ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख महंत वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री,आळंदी येथील संतोष महाराज चैतन्य,हभप आत्माराम महाराज, कर्नल के.पी.सिंग, तहसीलदार डॉ. संजय बिरादार, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा स्नेहलताई चव्हाण-घाडगे पाटील,चेतन चव्हाण पाटील, प्राचार्य सोपानराव काळे,प्राचार्या दीपाली बाविस्कर, समन्वयक दत्तात्रय वांढेकर,उपप्राचार्य अरविंद देशमुख नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या उपाध्यक्षा स्नेहलताई चव्हाण-घाडगे पाटील यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले. प्राचार्य सोपानराव काळे यांनी प्रास्ताविक करत मॅरेथॉनचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी वेदांताचार्य देविदास महाराज यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या प्रांगणात झालेल्या बक्षीस वितरण कार्यक्रम प्रसंगी या स्पर्धेत ओम सरूनाथ महानोर याने ५ हजारांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावले, पावरा अविनाश सायसिंग याने द्वितीय क्रमांकाचे ३ हजार रुपयांचे तर हर्षल गजमल चौरे याने तृतीय क्रमांकाचे दोन हजार रुपयाचे बक्षीस प्राप्त केले पहिल्या येणाऱ्या वीस विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

त्रिमूर्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सोपानराव काळे, त्रिमूर्ती पब्लिक स्कूलच्या प्राचार्य दिपाली बाविस्कर, त्रिमूर्ती इंटरनॅशनल स्कूलची प्राचार्य प्राचीन जोसेफ, निवासी प्राचार्य एकनाथ कापसे, उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे, समन्वयक दत्तात्रय वांढेकर, कुस्तीचे राष्ट्रीय पंच संभाजी निकाळजे, मुख्य सैनिकी प्रशिक्षक परमेश्वर कसाळ, विभाग प्रमुख नामदेव ताके, जितेंद्र पाटील, मिलिंद सोनवणे, संतोष राऊत, बस विभाग प्रमुख प्रवीण पंडित, अरविंद देशमुख, सर्व सैनिकी प्रशिक्षक, सर्व क्रीडा प्रशिक्षक, तीनही विद्यालयांचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## सभासदांच्या हितासाठी तडजोडीचा मार्ग स्वीकारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**माळवाडगाव** : अशोक सहकारी साखर कारखाना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी तसेच सभासदांच्या हितासाठी चेअरमन भानुदास मुरकुटे यांनी भविष्यात सहनशीलता ठेवून तडजोडीचा मार्ग स्वीकारावा, असा सबुरीचा सल्ला कारखान्याचे माजी कामगार संचालक काशिनाथ गोराणे बाबा यांनी दिला. अशोक सहकारी साखर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी मुरकुटे यांनी दीर्घकाळ कारखान्याची धुरा सांभाळत शैक्षणिक संस्था कारखान्याशी संलग्न ठेवल्याबद्दल सभासदांच्या वतीने गोराणे यांनी त्यांचा सत्कार केला. गोराणे म्हणाले, अशोक सहकारी साखर कारखान्याने शैक्षणिक संस्था कारखान्याच्या मालकीच्या ठेवून सभासदांच्या मुला-मुलींना शिक्षणाची मोठी संधी उपलब्ध करून दिली. पदवी शिक्षणाबरोबरच औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय आदी संस्थांमुळे पूर्व भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे शक्य झाले. या संस्थांमधून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी उच्च पदांवर कार्यरत आहेत. याचे श्रेय चेअरमन भानुदास मुरकुटे यांना जाते, असे त्यांनी सांगितले. कारखाना टिकविण्यासाठी मुरकुटे यांनी मोठ्या कष्टाने अहोरात्र प्रयत्न केले. प्रसंगी आमदारकी पणाला लावून कारखाना वाचविण्याचे काम केले. त्यामुळे सभासदांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. मात्र, सध्या कारखाना अडचणीच्या परिस्थितीतून जात असल्याने सभासदांच्या हितासाठी सहानुभूतीपूर्वक विचार करून तडजोडीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन गोराणे यांनी केले.

## टाकळीभानच्या लक्ष्मीवाडी अंगणवाडीत 'नवचेतना व आधाराशना' उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : येथील लक्ष्मीवाडी अंगणवाडी केंद्र क्रमांक २४५२२२३०५२८ येथे 'नवचेतना व आधाराशना' कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी बालकांच्या सर्वांगीण विकासासह आरोग्य, स्वच्छता आणि अंगणवाडीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास गटविकास अधिकारी स्मिता निकाळजे, बाल विकास प्रकल्प अधिकारी शोभा शिंदे गडम, बालसंगोपन अधिकारी भिसे, पर्यवेक्षिका कल्पना फास्टे तसेच माजी पर्यवेक्षिका खेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अंगणवाडीतील बालकांचे अर्धवार्षिक वाढदिवस साजरे करण्यात आले. तसेच चिमुकल्यांसाठी दहीहंडीचा उपक्रम घेण्यात आल्याने बालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

अंगणवाडी सेविका शिंदे व कासट्टी यांनी बालकांच्या मानसिक, भाषिक, शारीरिक, सामाजिक आणि सृजनशील विकासाबाबत मार्गदर्शन केले.

तसेच आरोग्य व स्वच्छतेचे महत्त्व सांगून ओला व सुका कचरा वेगळा करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. बालकांनी सादर केलेल्या विविध उपक्रमांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

यानंतर गरोदर मातांचा सन्मान करण्यात आला. सेवा संकल्प अभियानांतर्गत संरक्षण अधिकारी दिपाली भिसे यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना व बालविवाह प्रतिबंध याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास टाकळीभान गटातील महिला व अंगणवाडी सेविका-मदतनीस मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पान १ वरुन

### शेवगावच्या हक्काचे पाणी कोणीही हिरावून घेणार नाही

अधिकारी उपस्थित होते.मंत्री विखे पाटील यांनी सुमारे अडीच तास शेवगाव-पाथर्डी तालुयातील शेतकरी व नागरिकांच्या तक्रारी आणि समस्या जाणून घेतल्या. उपस्थित केलेल्या प्रश्नांवर संबंधित अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण घेत त्यांनी टंचाईच्या काळात पाणी व चाऱ्याचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. सध्याच्या परिस्थितीत पशुधन हा शेतकऱ्यांचा मोठा आधार असून, पशुधन वाचविण्यासाठी प्रशासनाने गांभीर्याने प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी दिले. ताजनापूर योजनेबाबत बोलताना विखे पाटील म्हणाले, सर्व शेतकऱ्यांना पाणी मिळावे, हीच आमची भूमिका आहे. शेवगावचे हक्काचे पाणी कोणीही काढून घेतलेले नाही. पहिल्या टप्प्यातील उर्वरित आठ आणि दुसऱ्या टप्प्यातील २२ गावांना पाणी देण्यासाठी आवश्यक निधीस मंजुरी देण्यात आली आहे. उर्वरित गावांसाठी तिसरा टप्पा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता दोन्ही तालुयांतील पाझर तलाव व बंधाऱ्यांमधील गाळ काढण्याची मोहीम तातडीने सुरू करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या कामांतून 'मागेल त्याला काम' उपलब्ध करून देत नागरिकांना दिलासा देण्याची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांनी दुष्काळाचे पंचनाम्यासाठी आलेल्या ग्रामसेवकाला लावले हुसकावून चुकीचे पंचनामे केल्याचा आरोप...

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** तालुक्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्याने शासनाकडून पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, या पंचनाम्याच्या प्रक्रियेवरच आता शेतकऱ्यांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

वैजापूर तालुक्यातील चांदेगाव येथे दुष्काळाच्या पंचनाम्यासाठी आलेल्या ग्रामसेवकाला संतप्त शेतकऱ्यांनी हुसकावून लावल्याचा प्रकार समोर आला आहे. नियमानुसार स्थानिक पातळीवर तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक अशा



त्रिसदस्यीय समितीने प्रत्यक्ष शेतात जाऊन पंचनामे करणे अपेक्षित आहे. मात्र, चांदेगाव येथे या तीन सदस्यांपैकी केवळ एकच सदस्य पंचनामे करताना दिसून आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, जे पीक हिरवे दिसत आहे, त्याचे नुकसान झालेले नाही, असे या एकमेव उपस्थित सदस्याने म्हटल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. मात्र, कृषी सहाय्यक आणि इतर सदस्य पंचनाम्याच्या वेळी उपस्थित नसताना पिकाचे नुकसान झाले आहे की नाही, हे निश्चितपणे कसे ठरवणार? असा थेट सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, दुष्काळी परिस्थितीत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या नुकसानीची योग्य नोंद होणार का, पंचनामे नियमानुसार आणि पारदर्शक पद्धतीने केले जाणार का, याबाबत आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चांदेगावमधील या प्रकारामुळे पंचनाम्याच्या संपूर्ण प्रक्रियेवरच शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# भेंडाळा आरोग्य केंद्रात कर्मचारी गैरहजर

### जि.प. सदस्या वैजयंती शिरसाठ यांनी नोंदवली गंभीर बाब

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : तालुक्यातील भेंडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा परिषद सदस्या वैजयंती वाल्मिक शिरसाठ यांनी आरोग्य केंद्राच्या कामकाजाची पाहणी केली. दरम्यान कर्मचारी उपस्थितीची तपासणी केली असता अनेक कर्मचारी कर्तव्यावर गैरहजर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. भेट पुस्तिकेत करण्यात आलेल्या नोंदीनुसार, वैद्यकीय अधिकारी डॉ. रोशनी चव्हाण तसेच नऊ पैकी केवळ दोनच कर्मचारी उपस्थित होते. मात्र, मंजूर पदसंख्येच्या तुलनेत अनेक कर्मचारी अनुपस्थित असल्याचे पाहणीत आढळून आले. तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. अथर पठाण हेही मुख्यालयात उपस्थित नसल्याची नोंद करण्यात आली आहे. यापैकी श्रीमती ज्योत्सना शेळके (डक्त) या रजेवर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आरोग्य केंद्रासारख्या अत्यावश्यक सेवेशी संबंधित संस्थेत कर्मचारी वेळेवर उपस्थित नसणे ही गंभीर बाब असून, त्याचा थेट परिणाम ग्रामीण भागातील नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांवर होऊ शकतो, अशी नोंद शिरसाठ यांनी भेट पुस्तिकेत केली आहे. गैरहजर कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व वेतन कपातीची कारवाई करुन आरोग्य केंद्रातील कर्मचारी नियमितपणे उपस्थित राहून नागरिकांना वेळेत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याबाबत वरिष्ठांनी लक्ष घालावे, अशी मागणी जि.प.सदस्या वैजयंती शिरसाठ यांनी केली आहे.

# खांडवे अण्णांच्या कार्याला अभिवादन

## संत गाडगे महाराज आश्रमशाळेत विविध कार्यक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : श्री संत गाडगे महाराज आश्रमशाळेत दिवंगत तुकाराम खांडवे ऊर्फ अण्णा यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी तसेच उपस्थित मान्यवरांनी खांडवे अण्णांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला. श्री संत गाडगे महाराज हे निःस्वार्थ कर्मयोगी, थोर समाजसुधारक आणि लोकप्रबोधनकार होते. ग्रामस्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, जनजागृती तसेच धर्मशाळा, गोशाळा, रुग्णालये आणि



आश्रमशाळांच्या माध्यमातून त्यांनी समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. 'भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी, गोरगरिबांना शिक्षण' हा त्यांचा संदेश आजही समाजाला प्रेरणा देत आहे. गाडगे महाराजांचा सहवास लाभलेल्या तुकाराम खांडवे अण्णांनी त्यांच्या विचारांचा व कार्याचा वारसा पुढे नेला. राहुरी आश्रमशाळेची जबाबदारी स्वीकारून त्यांनी नगर जिल्ह्यातील टाकळी काझी, भानसहिवरे, मिरपूर लोहार, ताथवडा-चौसाळा आदी ग्रामीण भागांत शैक्षणिक संस्था उभारण्यासाठी योगदान दिले. गरीब व वंचित विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनासह विविध संस्थांनी त्यांना 'दलित मित्र', 'आदिवासी सेवक', 'सेवातल' व 'सातत्य भूषण' आदी पुरस्कारांनी सन्मानित केले. यावेळी मराठा महासंघाचे अध्यक्ष शिवाजी डौले, नगरसेविका तथा बालकल्याण समितीच्या सभापती स्मिताताई भुजाडी, भारती खिलारी, मुंबई मिशनचे संचालक नाचवणे, गोमटे, आहेर, सुरेखा भोई, मुख्याध्यापक सुरेश थेटे, सदाशिव शेळके यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# मोठ्या थाकीत कर्जदारांची यादी सोसायटी मध्ये लावणार : राहुल पटारे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : टाकळीभान सेवा संस्थेचे कर्ज घेऊन थकीत ठेवणार्या व संस्थेला फसवणार्यांवर कडक कायदेशीर कारवाई करणार आहे. संस्थेचे कर्ज घेवुन थकवणार्या थकीत सभासदांची यादी लवकरच फलकावर लावणार असल्याचे प्रतिपादन टाकळीभान सोसायटीचे विद्यमान चेअरमन राहुल पटारे यांनी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षीय भाषणात बोलताने केले. यावेळी व्हा. चेअरमन सुनंदा कोकणे, जेष्ठ संचालक मंजाबापु थोरात, अशोकचे माजी चेअरमन ज्ञानदेव साळुंके, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, कारेगाव भागचे संचालक शिवाजी शिंदे, जेष्ठ नेते विष्णुपंत खंडागळे, बाजार समितीचे संचालक मयुर पटारे, माजी चेअरमन भाऊसाहेब मगर, मधुकर कोकणे, दत्तात्रय नाईक, अॅड. राजेंद्र कापसे मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शन करताना चेअरमन पटारे म्हणाले कि, संस्थेच्या वतीने कृषी सेवा केंद्र, प्रक्रिया उद्योग, पेट्रोल पंप, दुध शितकरण केंद्र आदी शेतीपुरक उद्योग सुरु करण्याचे संचालक मंडळाचे धोरण आहे. संस्थेकडुन कर्ज घेवुन वर्षानुवर्षे परतफेड न करणारे संस्थेचे काही सभासद आहेत. या सभासदांची थकबाकिची यादी फलकावर प्रसिध्द करुन अशा सभासदांकडुन कर्ज वसुलीसाठी कडक कारवाई करणार असल्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला. कारेगाव भागचे संचालक शिवाजी शिंदे यावेळी म्हणाले कि, कर्जमाफि योजनेतील नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही २ लाखाचे प्रोत्साहन अनुदान मिळाले पाहीजे तसा ठराव करुन तो वरीष्ठांकडे मागणी करण्यात यावी. तसेच पिकांना उत्पादन खर्च जास्त येत असल्याने जिल्हा बँकेने एकरी पिक कर्ज चाळीस हजार रुपयापर्यंत करावे. दुष्काळी परीस्थिती आसल्याने व पाण्याचे स्त्रोत आटल्याने सुरु आसलेल्या शेती आवर्तनातुन बंधारे व गावतळे भरण्याची मागणी जलसंपदाकडे करावी. माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे यावेळी म्हणाले, दुष्काळी परीस्थिती असल्याने खरीप उत्पादनात मोठी घट झाली आहे. त्यामुळे कर्ज वसुलीचा तगादा करु नये. गेल्या २०१९ च्या कर्जमाफि योजनेत पात्र आसलेल्या ११२ कर्जदार सभासदांना जाणुनबुजुन डावलले गेल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत त्याबाबत त्या थकित शेतकऱ्यांना लाभ मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करावेत.

# महात्मा गांधीजींचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे : जयराज दंडवते



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** :राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी द्रोणा अकॅडमीचे अध्यक्ष जयराज दंडवते यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि साधेपणाच्या विचारांचा तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या देशीभक्ती, प्रामाणिकपणा आणि जय जवान जय किसान या प्रेरणादायी विचारांवर भाषण केली. विद्यार्थ्यांनी दोन्ही महान नेत्यांच्या जीवनकार्याची माहिति देत त्यांच्या आदर्शाचा आपल्या जीवनात अंगिकार करण्याचे आव्हान केले. महात्मा गांधीजींच्या स्वच्छतेच्या विचारांना उजाळा देत विद्यार्थ्यांनी स्वच्छता व परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला. तसेच देशसेवा, कर्तव्यनिष्ठ सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. द्रोणा अकॅडमीच्या वतीने अशा प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय मूल्य सामाजिक जबाबदारी आणि देशभक्तीची भावना रुजवण्याचा प्रयत्न केला. यावेळी द्रोणा अकॅडमी चे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते.

# ग्रामपंचायतीत रमहात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात

**माळवाडगांव** : मुठेवाडगांव ग्रामपंचायत येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व लाल बाहदूर शास्त्री याची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ह यावेळी प्रतिमा पूजन गावातील जेष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले यावेळी सर्व ग्रामस्थाना सुभेच्छा देण्यात आल्या या कार्यक्रमासाठी सरपंच सागर मुठे,ग्रामसेवक भाऊसाहेब, सोसायटीचे व्हा चेअरमन बबनराव मुठे,माजी सरपंच शिवाजी मुठे जालिंदर मुठे, बाळासाहेब मुठे,चांगदेव मुठे,बाबासाहेब भोंडगे,बाबासाहेब रुपटक्के,दीपक रुपटक्के,प्रदीप मुठे,अमोल मुठे संतोष मुठे प्रा कोळसे,ज्ञानदेव मल्हारी मुठे,सोपान मुठे श्रीकृष्ण मुठे तात्यासाहेब चौधरी आबासाहेब घोडेचोर सचिन मुठे पराजी भोंडगे सुदाम महाराज मुठे बापूसाहेब मुठे कैलास दिवेकर भारत कडूस अशेक गोसावी,शेतकरी संघटनेचे संतोष मुठे चंद्रकांत खरे दशरथ मुठे कचरू मुठे, मच्छिंद्र रूपटक्के शाम मुठे यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात पर्जन्यमानात ४५.५० टक्के घट दुष्काळाची दाहकता भयानक

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : अहिल्यानगर जिल्ह्यात जून २०२६ ते सप्टेंबर २०२६ पर्यंत सरासरी ४४८.५३ मिलिमीटर इतका पाऊस पडत असतो. यंदा तो अवघा २४४.४४ मिलिमीटर इतकाच पडला आहे. सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत २०४.९ मिलिमीटर इतकी त्यात घट झाली आहे. संपूर्ण जिल्ह्यात या कालावधीत ४५.५० टक्के इतका पर्जन्यमानात खंड पडला आहे.

पर्जन्यमानाची जिल्ह्यातील तालुका निहाय माहिती अशी - जून २०२६ ते सप्टेंबर २०२६ पर्यंत झालेले एकूण पर्जन्यमान कंसात सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत झालेली घट मिलिमीटर मध्ये दर्शविण्यात आली आहे.

अकोला - २२५.५ (२६३), जामखेड - २६३.१ (३१२ ), कर्जत - २६३.३० (१८४.१०), कोपरगाव - ३०३.८(१००.५०), नगर - २९९.३ (१८०.५०), नेवासा - १७४.०(२५५.८०), पारनेर - १८६.०(२२८.३०), पाथर्डी - १६७.३(३०५.८०), राहाता - ११०.०(३४४), राहुरी - २२३(२०८.८०), संगमनेर - ५६५.२(२१४), शेवगाव - २७१.१(१९२.१०), श्रीगोंदा - १६६.५ (२३६.४०), आणि श्रीरामपूर - २०३(२६०).

दुष्काळाची दाहकता



पर्जन्यमानात अचानक घट झाल्याने संपूर्ण राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष आतापासूनच जाणू लागले आहे राज्य सरकार ही खडबडून जागे झाले असून दुष्काळ टंचाई निवारण संदर्भात त्यांनी तातडीने पावले उचलली आहेत.

असे जरी असले तरी ग्रामीण भागात दुष्काळाची दाहकता मात्र झपाट्याने वाढत आहे. गुरांच्या साऱ्यांचा प्रश्न काही अंशी मिटणार असला तरी जनावरांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. यामुळे शेतकरी पूर्ण हतबल झाला आहे. गावोगाव आता या दुष्काळाची चर्चा ऐकायला मिळत आहे.

# शाहू विद्या मंदिरचा साद पठाण यांस जिल्हास्तरीय तायक्वान्दो स्पर्धेत सुवर्ण पदक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने श्रीगोंदा येथे नुकत्याच संपन्न झालेल्या जिल्हा स्तरीय तायक्वान्दो स्पर्धेत राहूरी तालुक्यातील खडांबे येथील श्री शाहू विद्या मंदिर चा विद्यार्थी साद इम्रान पठाण याने जिल्हा स्तरीय सुवर्ण पदक पटकावले आहे.




साद पठाण याची पुढील पुणे विभागीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

साद यांस प्राचार्य अप्पासाहेब शिंदे, क्रीडा शिक्षक राहुल जाधव, सर्व शिक्षक तसेच लक्ष्मण हरिश्चंद्रे,वांबोरी येथील के. टायगर तायक्वान्दो अकॅडमी चे अमोल जऱ्हाड सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय पवार, उपाध्यक्ष प्रभाकर हरिश्चंद्रे,सरपंच अण्णासाहेब माळी उपसरपंच अमोल हरिश्चंन्द्रे, वांबोरी येथील के. टायगर तायक्वान्दो अकॅडमी चे अमोल जऱ्हाड सर, जेष्ठ पत्रकार रफीक शेख, हसनापूरचे उपसरपंच राजूभाई शेख आदींनी साद पठाण याचे अभिनंदन केले आहे.

## निधन

### विश्वनाथ कोडम



**अहिल्यानगर** : विश्वनाथ गोपय्या कोडम (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### काशिनाथ तापोळे



**श्रीरामपूर** : येथील काशिनाथ संपत तापोळे (वय-७६) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा रिवार आहे. भगतसिंग चौकातील अदसविका न्यूज पेपर एजन्सीचे मालक दत्तात्रय तापोळे व संजय तापोळे यांचे वडील होत

# मराठा पतसंस्थेचा २१ वा वर्धापनदिन उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथील मराठा पतसंस्थेचा शाखेचा २१ वा वर्धापनदिन जिजाऊ वंदना गाऊन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ,राष्ट्रपिता महात्मा गांधी,माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. मराठा पतसंस्थेच्या नेवासा शाखेला उत्कर्षाकडे नेण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरी महाराज, माऊली आश्रमाचे महंत ज्ञानेश्वर महाराज हजारे, लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, डॉ.मुरलीधर कराळे, श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे, माजी प्राचार्य किशोर धनवटे, शेतकरी नेते पी. आर. जाधव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष रावसाहेब घुमरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.यावेळी आलेल्या मान्यवर व सभासदांचे मराठा पतसंस्थेचे नेवासा शाखाधिकारी संभाजीराव मते यांनी स्वागत करत प्रास्ताविक केले. मराठा पतसंस्थेच्या नेवासा शाखेने दहा कोटी ठेवींचा टप्पा पार केला असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पतसंस्थेचे मार्गदर्शक माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे यांना जीवन गौरव तसेच किशोर धनवटे यांना अहिल्यानगर येथील पब्लिक एक्सलन्स अवार्ड मिळाल्याबद्दल त्यांचा मराठा पतसंस्थेच्या वतीने मराठा सेवा संघाचे अध्यक्ष रावसाहेब घुमरे व संभाजीराव मते पाटील,पी आर जाधव यांच्या हस्ते सत्काराडरे गौरव करण्यात आला. पत्रकार बाळासाहेब देवखिळे व पी आर जाधव यांनी मनोगत व्यक्त करत मराठा पतसंस्थेच्या उत्कर्षासाठी महत्वपूर्ण सूचना केल्या.यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी ज्ञानोदय इंग्लिश स्कूलचे प्राचार्य रावसाहेब चौधरी, बबनराव नागोडे, शारदाताई वांढेकर, अॅड. स्मिताताई लवांडे, दत्तात्रय निपुंगे, सुनील घोलप, दशरथराव मुंगसे, ज्ञानेश्वर जाधव, राजू गाडेकर, इंजिनियर अक्षय देवखिळे, सरस्वती लोंढे, सोनाली घोलप, जयश्री दंबीवाल, रेखाताई शिंदे, पतसंस्थेचे व्यवस्थापक संतोष पारखे, सूरज कडू, माधुरी शेळके यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# औषधे बदलण्यावरून मानोरीत दोन गटांत हाणामारी; परस्परविरोधी गुन्हे दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : औषधे उधारीवर न दिल्याच्या तसेच घेतलेल्या गोळ्या बदलून देण्याच्या कारणावरून राहुरी तालुक्यातील मानोरी येथे दोन गटांत वाद होऊन हाणामारी झाल्याची घटना दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात फिर्यादी दाखल केल्या असून, पोलिसांनी परस्परविरोधी दोन गुन्हे दाखल केले आहेत. एका गुन्ह्यात अक्षय पिसाळ यांच्यासह त्यांच्या नातेवाईकांना मारहाण केल्याचा आरोप असून, दुसऱ्या गुन्ह्यात वसंत आढाव व त्यांच्या मुलांना जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अक्षय बाळासाहेब पिसाळ (वय २५, रा. मानोरी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास ते मानोरी येथील माऊली मेडिकलमध्ये असताना विशाल वसंत आढाव तेथे आला. 'तू मला औषधे उधार का देत नाहीस?' असे म्हणत त्याने अक्षय पिसाळ यांना शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हा वाद सोडविण्यासाठी अक्षय यांचे भाऊ, आई-वडील तेथे गेले असता अन्य आरोपीही तेथे आले. त्यानंतर सर्वांनी मिळून अक्षय पिसाळ व त्यांच्या नातेवाईकांना लाकडी दांडा, लोखंडी गज व कुऱ्हाडीने मारहाण करून जखमी केल्याचा आरोप आहे. तसेच 'आमच्या नादी लागलात तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही,' अशी धमकी देऊन आरोपी निघून गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या फिर्यादीवरून विशाल वसंत आढाव, वैभव वसंत आढाव, विवेक वसंत आढाव व वसंत फ्रान्सिस आढाव (सर्व रा. गणपतवाडी, मानोरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, याच घटनेबाबत वसंत फ्रान्सिस आढाव (वय ५२, रा. मानोरी) यांनी दिलेल्या फिर्यादीत वेगळी बाजू मांडली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, दि. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास त्यांना सर्दी, खोकला व ताप असल्याने त्यांचा मुलगा विशाल याने माऊली मेडिकलमधून औषधे आणली होती. औषध घेतल्यानंतर त्रास झाल्याने गोळ्या बदलून आणण्यासाठी विशाल याला पुन्हा मेडिकलमध्ये पाठविण्यात आले. मात्र, मेडिकलमधील अक्षय पिसाळ यांनी गोळ्या बदलून देण्यास नकार दिल्याचे विशालने फोनवरून वडिलांना सांगितले.

त्यानंतर वसंत आढाव व त्यांचा मुलगा विवेक हे मेडिकलमध्ये गेले असता, आरोपींनी त्यांना व त्यांच्या मुलांना जातीवाचक शिवीगाळ करून 'तुम्ही आमच्या मेडिकलमध्ये यायचे नाही,' असे सांगितल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच लोखंडी गजाने मारहाण करून 'आमच्या नादी लागला तर तुम्हाला गावात राहू देणार नाही,' अशी धमकी दिल्याचेही म्हटले आहे.

या फिर्यादीवरून अक्षय बाळासाहेब पिसाळ, किरण बाळासाहेब पिसाळ, राहुल छबुराव पिसाळ, संदिप छबुराव पिसाळ, बाळासाहेब सुंदर पिसाळ, अक्षय यांची आई मंगल बाळासाहेब पिसाळ व अन्य एक अशा सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही गटांच्या परस्परविरोधी तक्रारींमध्ये एकमेकांवर मारहाण, शिवीगाळ व धमकी दिल्याचे आरोप करण्यात आले आहेत. त्यामुळे या घटनेत नेमकी सुरुवात कशामुळे झाली, याबाबत पोलिसांकडून तपास केला जात आहे. एका गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संभाजी बडे करीत आहेत, तर दुसऱ्या गुन्ह्याचा तपास श्रीरामपूर येथील उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर करीत आहेत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शनिवार दि. ०३ ऑक्टोबर २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | ३५७<br>६९०<br>७९९ | ९ | २८९<br>४६९<br>६६७ | ० | ३७०<br>४६०<br>५५० |

५४-६५-९८-१९-०७-३०

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | ३६७<br>१२३<br>२७७ | २ | २४६<br>४८०<br>६८८ | ७ | ४५८<br>४६७<br>७०० |

६३-०६-२५-१२-७८-९७

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

सुट्टी

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

# शासनाच्या पर्यटन विकास निधीतून मोहटादेवी घाटाचे काम पूर्ण

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** मोहटादेवी देवस्थान मध्ये शारदीय नवरात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून यंदा भाविकांना गडाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत वाहने जाण्यासाठीची मुख्य अडचण दूर झाली आहे. अत्यंत सुसज्ज, दुपदरी, मजबूत व सुरक्षित असा घाट पूर्ण झाला आहे. राज्य शासनाच्या पर्यटन विकास निधीतून रस्त्यासाठी सहा कोटी रुपयांचा भरीव निधी मिळाला.

नवरात्रोत्सवासाठी राज्याच्या विविध भागातून लाखो भाविक मोहटादेवीच्या दर्शनासाठी येतात. गडाच्या पायथ्याला भक्त निवास पासून सुमारे अर्धा किलोमीटर लांब अंतरावर पार्किंगची सुविधा असते. सध्या तीव्र उन्हाळा असल्याने तिथून पायी चालत डोंगर चढून देवी दर्शनासाठी जाताना बहुतांशी भाविकांना प्रचंड त्रास होतो. यामध्ये जेष्ठ नागरिक , महिला, विविध आजाराचे रुग्ण, लहान मुले यांना मोठा त्रास सहन करत जावे लागते. लहान मुलांना खांद्यावर अथवा कडेवर घेत डोंगर चढून जाताना पालकांची अक्षरशः कसरत होते.

पूर्वी अत्यंत अवघड वळणे, तीव्र चढ, वळण घेण्यासाठी अपूर्ण जागा असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून सर्व वाहने पायथ्याला थांबवली जात. एकाच वेळी अनेक वाहने आल्यास मंदिराच्या बाजूला पार्किंगची सुविधा नव्हती. आता किमान १००० वाहने मंदिराच्या परिसरात पार्किंग करता येतील एवढी भव्य सुविधा झाली असून व्हीआयपी वाहनांसाठी सुद्धा स्वतंत्र वाहन तळ आहे. पर्यटन विभागाच्या निधीतून मंदिराच्या मागील बाजूस रस्त्याचे झालेले काँक्रीटीकरण व रुंदीकरण सर्वच दृष्टीने लाभदायक ठरून भव्यतेमुळे मुख्य मंदिराच्या सौंदर्यातही भर पडली आहे. धोकादायक व तीव्र चढणीचा रस्ता उकरून त्याची उंची कमी झाल्याने सुरक्षितता वाढली आहे. रस्त्याचे काम खरोखरच अत्यंत दर्जेदार होऊन शासनाच्या इतर यंत्रणांकडून अशा प्रकारच्या दर्जेदार रस्त्यांची आवश्यकता या निमित्ताने व्यक्त होत आहे. घाटामध्ये दोन्ही वळणांच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत लँडस्केपिंग होऊन त्याचे सुशोभीकरण अत्यंत आकर्षक पद्धतीने होणार आहे . धार्मिक सहलीबरोबरच भाविकांना पर्यटनाच्या दृष्टीने सुद्धा अधिकाधिक समाधान मिळावे, असे नियोजन देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

मोहटा देवस्थान समितीची सध्या एक बस असून ही गाडी पाथर्डी वरून मोहटा गडावर फेऱ्या करते. नवरात्र कालामध्ये या गाडीने गडाचा पायथा ते गड अशी गरजू भाविकांची वाहतूक तेवढ्याच दरामध्ये केल्यास भाविकांच्या सोयी बरोबरच देवस्थानच्या खर्चातही यामुळे बचत होणार आहे. बस स्टॅन्ड व पार्किंग स्टॅन्ड परिसरातील वाहतूक कोंडी टाळायची असेल तर किमान एस टी बसेसना तरी गडावर जाण्याची परवानगी उन्हाच्या वेळी मिळावी. पोलीस यंत्रणेवरील वाहतूक कोंडीचा ताण काही प्रमाणात कमी होणार आहे. घाटाचे काम व रुंदीकरण यामुळे संपूर्ण गडाचा लुक बदलला असून भाविक सुद्धा घाटाच्या मध्ये थांबून विविध प्रकारे फोटोसेशन करीत आहेत. यंदा पावसाळा आला कधी, आणि गेला कधी याचा अंदाज येईपर्यंतच उन्हाळा सुरू झाला. पावसाळ्यानंतर हिवाळा सुरू होण्याअगोदरच उन्हाळ्याची सुरुवात झाल्याने यात्रा समितीचे नियोजन उन्हाळ्याचे दिवस समजून व्हायला हवे, असे भाविकांची इच्छा आहे. गरजू भाविकांना गडावर सोडण्याची सुविधा उपलब्ध न झाल्यास घाटामध्ये ठीक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय देवस्थान समितीला करावी लागणार आहे. यापूर्वी येणाऱ्या नवरात्र मध्ये उन्हाची तीव्रता नव्हती. हवेमध्ये गारवा असायचा. सर्वत्र वातावरण अल्हाददायक असायचे. त्यामुळे डोंगर चढून पायी जाताना भाविकांना फारसा त्रास होत नाही.

# जिल्हा बँकेत इच्छुकांची उमेदवारी अर्ज नेण्याची वाढती संख्या चिंतेची बाब : सभापती प्रा.राम शिंदे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मिरजगाव :** जिल्हा बँक निवडणूक बिनविरोध व्हावी म्हणून एकीकडे बिनविरोध निवडणुकीचे वारे वाहत असताना यामध्ये मी देखील सकारात्मक झालो. परंतु संगमनेरमध्ये अचानक बैठक झाली. अन् इच्छुकांची अर्ज नेण्याची संख्या ५०० हून पुढे गेली. बँक निवडणुकीची अर्ज विक्रीची वाढती संख्या चिंतेची बाब असल्याचे सांगत विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर निशाणा साधत आ.रोहित पवारांनी वास्तविक पाहता मतदारसंघात लक्ष दिले पाहिजे.

मतदार संघात त्यांनी लक्ष द्यावे, ते तसे न करता सध्या विदर्भात दौरे करत असल्याची टीका केली. कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे कर्जत, जामखेड व श्रीगोंदा तालुक्यांसाठी गो-गॅसचे अधिकृत वितरक असलेल्या 'शिवांश एंटरप्रायजेस'च्या उद्घाटन समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सभापती ना.शिंदे बोलत होते.

याप्रसंगी ह.भ.प. सावता महाराज वसेकर, मिरजगाव ग्रामपंचायत सरपंच सौ.सुनीता खेतमाळस, नितीन खेतमाळस, सावता परिषदेचे तालुका अध्यक्ष डॉ.पंढरीनाथ गोरे, राजेंद्र गुंड, नगरसेवक प्रसाद ढोकरीकर, अशोक खेडकर, उपसरपंच लहु वतारे, अनिल गदादे, संतोष म्हेत्रे, विनोद दळवी, उद्योजक उद्धवशेठ नेवसे, बापूशेठ कासवा, अतुल राजेजाधव, राहुल गांगर्डे, संपत बावडकर, गंगाधर पांडुळे, डॉ. रामदास सूर्यवंशी, सदाबापू शिंदे, डॉ.विलास कवळे, शरद मेहेत्रे, विजय पवार, सारंग घोडेस्वार, हरिदास केदारी, महेश पांडुळे, दादा बुद्धिवंत, संदीप बुद्धीवंत, आकाश वाघ, गणेश नलावडे, भगवान शिंदे, अंकुश मेहेत्रे, पोपट कोरडे, हर्षल जवणे, बिभीषण सूर्यवंशी, शरद गांगर्डे, निवृत्ती जवणे, मीनाक्षी फरताडे, कांचन बिडवे, शिवांश एंटरप्रायजेसचे ऋषिकेश खेतमाळस, शिवराज सूर्यवंशी यांच्यासह ग्रामस्थ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ना.शिंदे म्हणाले, राज्यात राजकारण करत असताना देखील मी मात्र माझ्या माणसातच आजही फिरत असून, दिसत आहे. माझ्या माणसात माझा जीव गुंतला आहे.

राज्य सरकार सध्याच्या दुष्काळावर उपाययोजना करत असताना शासनस्तरावर शेतकऱ्यांच्या मदतीसाठी येथील जनतेच्या प्रतिनिधी म्हणून मी देखील सातत्याने पाठपुरावा करत आहे. दुष्काळाच्या झळा तीव्र असल्याने पिण्याचे पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत सरकार धोरणात्मक उपाययोजना राबविण्यास प्रयत्नशील असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

यावेळी परिसरातील नागरिकांशी राम शिंदे यांनी संवाद साधला. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा असल्याची ग्वाही देत त्यांना धीर दिला. यावेळी अनेक मान्यवरांची भाषणे झाली. कार्यक्रमाच्या शेवटी माजी सरपंच नितीन खेतमाळस यांनी आभार मानले.

## द•ख•ल



### रविंद्र शेलार यांच्या माध्यमातून जवळा येथील धर्मनाथ विद्यालयाला निधी

**निघोज :** जवळा येथील धर्मनाथ विद्यालयाचे माजी विद्यार्थी बुरखार्ट कॉम्प्रेशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे असिस्टंट मॅनेजर रविंद्र शरद शेलार यांनी कंपनीच्या सी आर सी फंडातून साडे सहा लाखाचा निधी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त उपलब्ध करून दिला असून या कार्यक्रमाचे भुमिपूजन नुकतेच रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त शरद शेलार यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी बाजार समीतीचे माजी सभापती किसनराव रासकर, सरपंच अनिता आढाव, भाजपचे युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष पंकज कारखिले, माजी सरपंच सुभाष आढाव, बाजार समीतीचे संचालक संदीप सालके, कमलाकांत सोमवंशी, युवा नेते तथा विखे पाटील युवा मंचचे पदाधिकारी संदीप सालके, गोरख पठारे, तान्हाजी सालके, प्रताप पठारे, नाथा रासकर, संतोष पठारे, शशिकांत सोमवंशी, बुरखार्ट कंपनीचे अभियंता गणेश लाकूडझोडे, अनिल पिसाळ, महेश शेलार, मेजर संजय शेलार, पत्रकार शिरीष शेलार आदी तसेच ग्रामस्थ व स्कूल कमीटीचे पदाधिकारी व सदस्य तसेच, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कुमारी समृद्धी शेलार, अमृता आढाव, कृष्णा सोमवंशी, सुप्रिया आढाव, अलका सालके या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. रविंद्र शेलार यावेळी म्हणाले आपण या शाळेत शिक्षण घेतले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार शिरीष शेलार यांनी केले.

### भाळवणी येथे रविवारी तुळजाभवानी मातेची यात्रा

**भाळवणी :** सालाबादप्रमाणे श्रीक्षेत्र भाळवणी येथे कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेची पालखी यात्रा शनिवार दि. ३ रोजी दिवसभर यात्रा भरणार आहे. तसेच रविवार दि. ४ रोजी ढवळपुरी, दि. ५ रोजी टाकळी ढोकेश्वर, दि. ६ रोजी जामगाव येथे तर दि. ७ रोजी सुपा येथे पालखीची यात्रा भरणार आहे व त्यानंतर पालखी नगर तालुक्यात मार्गस्थ होणार आहे. या कालावधीत भाविकांनी पालखीच्या दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन येथील पालखीचे सेवेकरी संदीप भागवत यांनी केले आहे.



### निवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश सोपान निकम यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




**निघोज :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ लॉ कॉलेज, बेल्हे (बांगरवाडी), ता. जुन्नर येथे कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्थेतील व्यावसायिक नीतिमत्ता, न्यायालयीन शिस्त आणि कायदेविषयक जबाबदाऱ्यांची जाणीव व्हावी, या उद्देशाने 'व्यावसायिक नीतिशास्त्र आणि न्यायालय अवमान कायदा' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. पुणे येथील निवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश सोपान निकम यांनी प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूटचे विश्वस्त वल्लभ शेळके, समर्थ लॉ कॉलेजचे प्रा. डॉ. सुनील कवडे, ॲड. सुधीर कोकाटे, ॲड. अभिषेक भागवत, हरिओम ब्रह्मे, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, समर्थ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग ॲंड मॅनेजमेंट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे, प्रा. शिवाजी कुमकर तसेच समर्थ लॉ कॉलेजमधील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता. कायद्याच्या क्षेत्रात केवळ कायद्याचे पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून, त्यासोबत व्यावसायिक नीतिमत्ता, न्यायालयीन शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि आपल्या कर्तव्यांची जाणीव असणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन निकम यांनी केले.

# जि. प. शाळांमधील स्मार्ट विद्यार्थ्यांनी आ. राजळे यांचा चेंडू त्यांच्याच कोर्टात टोलवला

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** मुलांनो, शाळेत पाण्याच्या बाटलीत पिऊन उरलेले पाणी काय करता असा प्रश्न विचारताच, आम्ही झाडांना टाकतो, असे उत्तर. तुम्ही मोबाईल पाहता का.. क्षणात उत्तर आले,.. नाही... आई वडील पाहत असतील ना ?या प्रश्नावर सावध होत विद्यार्थ्यांनी उत्तर देणे ऐवजी शांत बसणे पसंत केले. आमदार मोनिका राजळे यांनी विद्यार्थ्यांची संवाद साधण्यासाठी त्यांच्या पद्धतीने प्रश्न विचारले, पण विद्यार्थ्यांनी त्यांचा चेंडू पुन्हा त्यांच्याच कोर्टात टोलवला. हजरजबाबी विद्यार्थी बघून आमदारां सह सर्वांनीच हसून विद्यार्थ्यांच्या समय सूचकतेचे कौतुक केले.

तहसील कार्यालयाच्या पुढाकाराने तालुक्यातील सर्वच शासकीय विभाग, महिला व बालकल्याण विभाग, बचत गट, शिक्षण विभागाच्या संयुक्त सहभागातून आयोजित सेवा संकल्प अभियान कार्यक्रमाचे आयोजन आप्पासाहेब राजळे मंगल कार्यालयात संपन्न झाले. विविध योजनांच्या अंमलबजावणी दरम्यान लाभार्थ्यांना थेट लाभ देण्याचा संकल्प यशस्वी होऊन आठ हजाराहून अधिक लाभार्थ्यांनी गेल्या काही दिवसांमध्ये शासनाच्या योजनेचा लाभ घेतला. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीमध्ये असे अभियान सर्वत्र राबविले जात आहे. शासनाचे सर्वच विभाग संयुक्तपणे यासाठी काम करतील. शिक्षण विभागाच्या उत्तम सादरीकरणाने कार्यक्रमांमध्ये रंगत आणली.

यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, नायब तहसीलदार किशोर सानप, नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर, पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, नंदकुमार शेळके, प्रतीक नांगरे, मनीषा उदमले, गटविकास अधिकारी राजेंद्र धस, मनीषा घुले, धनंजय बडे, गटशिक्षणाधिकारी सचिन राख, विस्तार अधिकारी रामनाथ कराड, आदींसह कर्मचारी, अधिकारी, बचत गट चळवळीतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# कर्जतच्या प्रांताधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी केली कार्यालयीन परिसराची स्वच्छता

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** महात्मा गांधी जयंती आणि सेवा संकल्प सप्ताहाचे औचित्य साधत कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील आणि त्यांचे सहकारी कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन परिसराची स्वच्छता मोहीम राबवत अवघ्या काही मिनिटांतच घाणेरडा परिसर चकाचक करण्याची मोहीम फत्ते केली. विशेष म्हणजे प्रांताधिकारी यांनी स्वता आपल्या हाती खुरपे, खराटा आणि खोरे घेत आपल्या कृतीतून एक आगळी-वेगळी जयंती साजरी केली.



दि. २ ऑक्टोबर वेळ सकाळची आठची कर्जतचे प्रांताधिकारी नितीन मधुकर पाटील यांनी स्वता आपले कार्यालय उघडले. लगत असणारे कारागृह कर्तव्यावर असणारे पोलीस बांधव आपली ड्युटी बजावत होते. प्रांताधिकारी यांनी हाती खराटा घेत आपला कार्यालयाचा परिसर स्वच्छ करण्याची कृती सुरू केली. साहेब एकटेच काम करताना पाहून लगतच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रांत कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांना नितीन पाटील यांनी हाती घेतलेली स्वच्छता मोहिमेची खबर दिली. शहरात आणि लगत राहणारे कर्मचारी बघता-बघता जमा होऊ लागले. सूचना आणि आदेश शरसंधान देणारे प्रांताधिकारी शांतपणे हाती मिळेल ते साहित्य घेत स्वच्छता करताना पाहून ते देखील यात सहभागी होऊ लागले. कार्यालयाच्या बाहेर पडलेला कचरा, आवारातील दत्त मंदिरालगत वाढलेले गवत, गोण्यात भरलेला घाण-कुबट कचरा तसेच माती या सर्व लोकांनी अवघ्या काही मिनिटातच स्वच्छ करण्याची किमया पार पाडली. तासाभरापूर्वी दिसणारा गलीच्छ, किळसवाणा परिसर आपल्या हातानी चकाचक झाल्याचे पाहून ते स्वतासह उपस्थित सर्वच अवाक झाले. कर्जतचे प्रांताधिकारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून एक आगळी-वेगळी जयंती साजरी करीत समाजात वेगळा आदर्श मांडला.

# भाजपा युवा मोर्चा कर्जत मंडल उपाध्यक्षपदी गोवर्धन खेडकर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**मिरजगाव :** कर्जत तालुक्यातील रवळगावचे सुपुत्र व एकनिष्ठ युवा कार्यकर्ते गोवर्धन दादासाहेब खेडकर यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा कर्जत मंडल उपाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपा युवा मोर्चा कर्जत मंडल अध्यक्ष निळकंठ शेळके यांनी ही निवड जाहीर केली आहे. गोवर्धन खेडकर हे गेली अनेक वर्षांपासून भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ व सक्रिय कार्यकर्ते म्हणून परिचित असुन सामाजिक कार्यातही ते नेहमीच अग्रेसर असतात. पक्षाची ध्येयधोरणे व विचारसरणी तळागळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याबरोबरच पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. रवळगाव परिसरासह कर्जत तालुक्यातील युवकांमध्ये त्यांचा दांडगा जनसंपर्क असून, पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली आहे.

# ताजनापूर टप्पा-३ साठी ५०० कोटींचा निधी : ना. विखे पाटील

## शेवगावनंतर पाथर्डीसाठी नवीन पाणी योजना

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती आणि तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. २) शेवगाव येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात विशेष आढावा बैठक झाली. आमदार मोनिका राजीव राजळे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी, शेतकरी व ग्रामस्थ बैठकीला उपस्थित होते.

टंचाईचे गांभीर्य लक्षात घेऊन अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा न करता युद्धपातळीवर उपाययोजना हाती घ्याव्यात. टंचाईच्या काळात जनतेला दिलासा देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात. अधिकाऱ्यांनी मुख्यालय सोडू नये, अशा स्पष्ट सूचना विखे पाटील यांनी दिल्या.

टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पुरवठा होणाऱ्या पाण्यावर फिल्टरची प्रक्रिया करून नागरिकांना पाणी देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. जनावरांना पाणी व चारा तसेच नागरिकांना पिण्याचे पाणी याला प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.



पाथर्डी तालुक्यात १३७ गावे असून त्यापैकी ५३ गावांमध्ये ६८ टँकर सुरू असल्याची माहिती तहसीलदार उद्धव नाईक यांनी बैठकीत दिली.

शेवगाव तालुक्याला हक्काचे पाणी दिल्यानंतरच पाथर्डी तालुक्यासाठी नवीन पाणी योजना हाती घेण्यात येईल. त्यासाठी सुमारे ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून सर्वेक्षण करून कामाला प्राधान्य देण्यात येईल, असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

ताजनापूर टप्पा क्रमांक एकमधील आठ गावांना पाणी देण्यासाठी ग्रामसभेचे ठराव घेण्यात येणार आहेत.

टप्पा क्रमांक दोनमधून १३ गावांना शेतीसाठी पाणी देण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ताजनापूर टप्पा क्रमांक तीन नव्याने हाती घेण्यात येणार असून त्यासाठी सुमारे ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा विखे पाटील यांनी केली.

# अन्यायाविरोधात ठामपणे उभा राहणारा लढवय्या कार्यकर्ता गमावला!

## केंद्रिय मंत्री आठवले यांच्याकडून अजय साळवे कुटुंबीयांचे सांत्वन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नीलक्रांती चौक येथील पोलीस मुख्यालयाच्या सभागृहात दिवंगत रिपब्लिकन नेते अजय साळवे यांच्या जलदान विधीनिमित्त सर्वपक्षीय अभिवादन सभा आयोजित करण्यात आली. यावेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी अजय साळवे यांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले.

रामदास आठवले म्हणाले की, अहिल्यानगर जिल्ह्यातील दोन लढवय्ये पँथर व्यक्तिमत्त्वे प्रत्येक वेळी माझ्या पाठीशी ठामपणे उभी राहिली. त्यामध्ये अशोक गायकवाड आणि अजय साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. अजय साळवे यांचा स्वभाव शांत होता; मात्र अन्यायाविरोधात उभे राहताना त्यांची भूमिका नेहमीच ठाम असायची. स्वतःच्या कुटुंबापेक्षा पक्ष मोठा, पक्षाच्या विचारांपेक्षा समाजहित मोठे, या भावनेने त्यांनी काम केले. दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठविणारा आणि चळवळीत सक्रियपणे सहभागी होणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती.

मला अजय साळवे यांच्या कार्याचा गर्व होता; मात्र आता अजय पर्व मला दिसणार नाही. आज येथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाला अजय साळवे यांच्या कार्याचा अभिमान होता, अशा भावना आठवले यांनी व्यक्त केल्या.

पक्षाच्या वाटचालीत कार्यकर्त्यांचे योगदान अधोरेखित करत आठवले म्हणाले की, माझ्या पक्षातील अनेक कार्यकर्त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली, पक्षाचा प्रचार व प्रसार केला. या कार्यकर्त्यांच्या ताकदीमुळेच मला दिल्लीत जाऊन केंद्रामध्ये काम करण्याची संधी मिळाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेताना अजय साळवे यांच्यासारखे कार्यकर्ते माझ्या पाठीशी नसते तर मला कोणी विचारले नसते. कार्यकर्त्यांची हीच खरी ताकद आहे.

आज अजय साळवे आपल्यात नाहीत. नीलक्रांती चौक सुन्न झाला आहे. त्यांच्या जाण्याने रिपब्लिकन चळवळीची मोठी हानी झाली आहे, असे सांगत आठवले यांनी अजय साळवे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

अजय साळवे यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंबावर मोठी जबाबदारी आली आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबातील एका मुलाला शासकीय सेवेत नोकरी मिळवून देण्यासाठी आपण सहकार्य करू, असे आश्वासन केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी यावेळी दिले.

प्रास्ताविकात नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, अजय साळवे यांच्या निधनाने आंबेडकरी समाजामध्ये व रिपब्लिकन चळवळीवर दुः



खाचा डोंगर कोसळला आहे. चळवळीशी प्रामाणिक राहून त्यांनी समाजाच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष केला. त्यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे. त्यांच्या कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्यामुळे त्यांच्या एका मुलाला शासकीय सेवेत घेण्यासाठी पक्षाने तसेच केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी सहकार्य करावे, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी अजय साळवे यांच्या पत्नी अनुराधा साळवे, मुलगा रविराज साळवे, निखिल साळवे, राहुल साळवे यांच्यासह नगरसेवक सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, मुंबई अध्यक्ष गौतम सोनवणे, काकासाहेब खंबळकर, विजयराव वाकचौरे, श्रीकांत भालेराव, सुरेंद्र थोरात, सुनील साळवे, प्रा. जयंत गायकवाड, विजयराव भांबळ, परिमल निकम, सुनील क्षेत्रे, किरण दाभाडे, सिद्धार्थ आढाव, भिमा बागुल, अंकुश भैलूमे, महेश भोसले, अविनाश शिंदे, विलास साठे, अमित काळे, विशाल कांबळे, संजय खामकर, अनंत लोखंडे, जाधव सर, गौतमी भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

## दखल

## जलसेवा संकल्प अभियानातून जलसाक्षरतेला चालना

पुणे : पाणी संवर्धन, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि कार्यक्षम वापराबाबत नागरिक, शेतकरी तसेच विविध घटकांमध्ये जनजागृती करण्यासाठी राज्यात २ ते १७ ऑक्टोबरदरम्यान 'जलसेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ येथे कार्यकारी संचालक संजीव चोपडे यांच्या हस्ते अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.बदलते हवामान, वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती मागणी यामुळे उपलब्ध जलस्रोतांवर ताण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटेकोर आणि विवेकपूर्ण वापर करण्याबाबत जनजागृती करण्यावर अभियानात भर देण्यात येणार आहे. जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन, जलसाक्षरता वाढविणे आणि जलव्यवस्थापनात नागरिकांचा सहभाग वाढविणे हा अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पांतून उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा शाश्वत व परिणामकारक वापर करण्यासाठी नागरिक, शेतकरी, पाणी वापर संस्था आणि सामाजिक संस्थांचा सहभाग वाढविण्यात येणार आहे. अभियानाच्या काळात लाभार्थी, पाणी वापर संस्था आणि प्रकल्पग्रस्त व पुनर्वसित नागरिकांशी संवाद साधला जाणार आहे.शेतकऱ्यांमध्ये उपलब्ध पाण्यानुसार पीक नियोजन, पाणी बचत आणि कार्यक्षम सिंचन पद्धतींबाबत जनजागृती केली जाणार आहे. विद्यार्थी व नागरिकांसाठी जलसाक्षरतेचे विविध उपक्रम राबविले जाणार असून, कृषी विज्ञान केंद्रे, स्वयंसेवी संस्था आणि जलतज्ज्ञांचाही सहभाग घेतला जाणार आहे.

## एसआयआर हरकतींसाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

पुणे : विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादीबाबत दावे व हरकती दाखल करण्यासाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. 'नो मॅपिंग' किंवा तार्किक विसंगतीमुळे नोटीस मिळालेल्या मतदारांना कागदपत्रे सादर करण्यासाठी तहसील कार्यालयात जाण्याची गरज नाही. संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मतदारांच्या घरी जाऊन कागदपत्रे स्वीकारणार आहेत.नोटीसधारक मतदारांनी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. उपलब्ध सुविधेनुसार व्हॉट्सॲप किंवा ऑनलाइन माध्यमातूनही कागदपत्रे सादर करता येणार आहेत. कागदपत्रे, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याचा अहवाल किंवा पंचनाम्याच्या आधारे पुढील कार्यवाही केली जाणार आहे. आवश्यकतेनुसार ऑनलाइन सुनावणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.३, ४, १० आणि ११ ऑक्टोबरला विशेष शिबिरे पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहू नयेत यासाठी ३, ४, १० आणि ११ ऑक्टोबरला जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरे घेण्यात येणार आहेत. या शिबिरांत प्रारूप मतदार यादीतील नावाची पडताळणी, नवीन मतदार नोंदणीसाठी नमुना ६, तसेच मतदार यादीतील तपशील दुरुस्तीसाठी नमुना ८ स्वीकारला जाणार आहे.कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ५ ते ९ ऑक्टोबरदरम्यान पात्र विद्यार्थ्यांची ऑनलाइन मतदार नोंदणी केली जाणार आहे. तसेच औद्योगिक आस्थापना, कंपन्या, कारखाने आणि विविध संस्थांमध्ये १२ ऑक्टोबरपर्यंत मतदार जागृती व विशेष नोंदणी उपक्रम राबविला जाणार आहे.

## विहिरीत पडलेल्या कुत्र्याला ग्रामस्थांनी दिले जीवदान

**कवठे येमाई :** कवठे येमाई येथील ढाकी वस्ती परिसरात विहिरीत पडलेल्या पाळीव कुत्र्याला ग्रामस्थांनी रस्सीच्या सहाय्याने



सुखरूप बाहेर काढत जीवदान दिले. रात्रीच्या वेळी बिबट्याने पाठलाग केल्याने कुत्रा विहिरीत पडला असावा, अशी शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली.

विहिरीत पाणी असून बाजूला खडकाची कपार असल्याने कुत्रा रात्रभर त्याच ठिकाणी उभा होता. सकाळी मोटार सुरू करण्यासाठी विहिरीजवळ गेलेल्या दत्तात्रय सांडभोर यांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यांनी तत्काळ ग्रामस्थांना माहिती देत मदतीसाठी धाव घेतली.

यानंतर दत्तात्रय सांडभोर, नितीन बाळासाहेब मुखेकर, पोपट सांडभोर आणि मनीषा सांडभोर यांनी प्रयत्न सुरू केले. कुत्र्याच्या पोटाला रस्सी बांधून काळजीपूर्वक त्याला विहिरीबाहेर काढण्यात आले. सुदैवाने कुत्र्याला गंभीर दुखापत झाली नाही.नितीन शरद मुखेकर हेही सहकाऱ्यांसह घटनास्थळी मदतीसाठी येत होते. मात्र, ते पोहोचेपर्यंत ग्रामस्थांनी कुत्र्याला सुखरूप बाहेर काढले होते. या प्रसंगात ग्रामस्थांनी दाखविलेल्या तत्परतेचे आणि मुक्या जीवाप्रती जपलेल्या संवेदनशीलतेचे परिसरातून कौतुक होत आहे.

# सेवा सेतू अभियान : १७५० वीजग्राहकांची सौर ऊर्जेला पसंती

### १७२ ठिकाणी 'किऑस्क'; ३४६३ नागरिकांनी दिली भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** वीजग्राहकांना महावितरणच्या विविध सेवा तसेच केंद्र व राज्य शासनाच्या सौरऊर्जा योजनांची माहिती, मार्गदर्शन आणि अर्ज प्रक्रिया एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'सेवा सेतू अभियाना'ला पुणे परिमंडलात चांगला प्रतिसाद मिळत आहे. पुणे परिमंडलात १७२ ठिकाणी उभारलेल्या किऑस्कला आतापर्यंत तब्बल ३४६३ नागरिकांनी भेट देऊन विविध योजनांची माहिती घेतली, तर १७५० ग्राहकांनी छतावरील सौर प्रकल्पासाठी अर्ज केले आहेत.

पुणे व पिंपरी-चिंचवड या महानगरांत विविध वॉर्डमध्ये, तर ग्रामीण भागात तालुक्याच्या ठिकाणी सेवा सेतू अभियानांतर्गत महावितरणने किऑस्क उभारले आहेत. या ठिकाणी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (डचअठढ) योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० याबाबत नागरिकांना माहिती व मार्गदर्शन करण्यात येत आहे. योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, अनुदान व आर्थिक लाभ, सौर संचाची क्षमता, अंदाजित खर्च, कर्ज सुविधा तसेच अधिकृत सौर कंत्राटदारांबाबत माहिती किऑस्कवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सूर्यघर योजनेंतर्गत १ किलोवॅटला ३० हजार, २ किलोवॅटला ६० हजार, तर ३ किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ७८ हजार रुपयांचे अनुदान मिळते. ज्या वीजग्राहकांचा मासिक वीज वापर १०० युनिटच्या आत आहे, अशा ग्राहकांना स्मार्ट योजनेतून लाभ घेता येतो. त्यासाठी सर्वसाधारण प्रवर्गासाठी १० हजार, अनुसूचित जाती-जमातींसाठी ५ हजार, तर दारिद्र्य रेषेखालील ग्राहकांना केवळ २५०० रुपयांत १ किलोवॅट क्षमतेचा प्रकल्प घराच्या छतावर लावता येतो. १ किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून सरासरी १२० युनिट वीज दरमहा तयार होते. यामुळे ग्राहकांचे वीजबिल शून्य होण्यास मदत होते.महानगरांच्या तुलनेत ग्रामीण भागातून सर्वाधिक ७२४ अर्ज आले आहेत. त्यापाठोपाठ गणेशखिंड शहर मंडलातून ६१४ व रास्तापेठ शहर मंडलातून ४१२ अर्ज सौरप्रकल्पासाठी प्राप्त झाले आहेत. हे किऑस्क १७ ऑक्टोबरपर्यंत उपलब्ध राहणार आहेत. नागरिकांनी जवळच्या किऑस्कला भेट देऊन प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना तसेच स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (डचअठढ) योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

## जुन्नर येथे गुणवंत विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा विकास कार्यशाळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जुन्नर :** पुणे जिल्हा परिषद आणि ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी विकास प्रबोधिनी, जुन्नर येथे गुणवंत विद्यार्थ्यांसाठी 'प्रज्ञा विकास कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले.

मागील वर्षी इस्रो व नासा यांच्या निवड चाचणीतील मुलाखतीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्त्व व कौशल्य विकास, नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव आणि प्रेरणा जागृती निर्माण करण्याबरोबरच त्यांच्या विशेष क्षमता ओळखून त्यांना योग्य दिशा देणे हा कार्यशाळेचा उद्देश होता.पुणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आणि पुणे जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी प्राथमिक ललिता दहितुले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे आणि पुणे जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी




कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या.

यावेळी जुन्नर तालुका अधिकारी अशोक लांडे, पुणे मॉडेल स्कूल समन्वयक-सल्लागार सिद्धार्थ चव्हाण आणि साने गुरुजी कथामाला प्रतिनिधी बाळासाहेब कानडे उपस्थित होते.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या विकासातील अडथळे ओळखून ते दूर करण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण प्रयोग आणि कृतीआधारित उपक्रम घेण्यात आले. ज्ञान प्रबोधिनी, पुणेचे प्रकाश रणनवरे, सिद्धेश पवार, शुभंकर केळकर, अमृता देसाई आणि सई मेहता यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जुन्नर, आंबेगाव आणि खेड तालुक्यांतील विद्यार्थी, पालक व मार्गदर्शक शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले. पुणे जिल्हा परिषद फेलो अस्मिता आल्हाट यांनी नियोजनासाठी सहकार्य केले. आदिवासी विकास प्रबोधिनी विश्वस्त तानाजी तळपे यांचे कार्यशाळेस सहकार्य लाभले. पुणे मॉडेल स्कूल सहायक उमेश धुमाळ यांनी आभार मानले.

## केसनंद येथे नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वाघोली :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे आणि पंचायत समिती हवेली यांच्या संयुक्त विद्यमाने केसनंद येथील जोगेश्वरी विद्यालयात इयत्ता तिसरी व चौथीच्या नवीन अभ्यासक्रमाचे चार दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले. २८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरदरम्यान झालेल्या या प्रशिक्षणात जिल्हा परिषद व खासगी अनुदानित शाळांमधील चार बीटमधील १२ केंद्रांतील १३३ शिक्षक सहभागी झाले.



प्रशिक्षणार्थी शिक्षकांना पंचायत समिती हवेलीचे विषयतज्ज्ञ सोमनाथ शिवले, डॉ. चित्रा गवारे, अपर्णा थोरात, अर्चना माने, संदीप महाले आणि राहुल घोडे यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणेचे प्राचार्य नामदेव शेंडकर, पंचायत समिती हवेलीचे विस्तार अधिकारी संदीप गिते, समूह साधन केंद्र समन्वयक सचिन यादव व सचिन जाधव तसेच जोगेश्वरी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनिता भोसले यांनी प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन मार्गदर्शन केले.

पंचायत समिती हवेलीचे विषयतज्ज्ञ तथा प्रशिक्षण समन्वयक सोमनाथ शिवले यांनी प्रशिक्षणाचे नियोजन व संनियंत्रण केले. नवनाथ शेळके, राजेंद्र गावडे आणि संदीप गारकर यांनी प्रशिक्षणासाठी सहकार्य केले. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकेश इंगवले यांनी केले, तर आभार नवनाथ शेळके यांनी मानले.

नवीन अभ्यासक्रमातील बदलांची माहिती प्रशिक्षणातून मिळाल्याने शिक्षकांना त्याचा अध्यापन प्रक्रियेत उपयोग करता येईल, असे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणेचे प्राचार्य नामदेव शेंडकर यांनी सांगितले. पंचायत समिती हवेलीचे गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे यांनी नवीन शैक्षणिक धोरण आणि अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास प्रशिक्षणाची मदत होईल, असे नमूद केले.

पंचायत समिती हवेलीचे विषयतज्ज्ञ तथा प्रशिक्षण समन्वयक सोमनाथ शिवले यांनी १३३ शिक्षक आणि सात सुलभकांच्या सहभागातून उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थेमुळे प्रशिक्षण यशस्वी झाल्याचे सांगितले.

## पावसाअभावी पूर्व आंबेगावात पिकांची होरपळ



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** पूर्व आंबेगावातील जिरायती भागात पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने खरीप पिके पाण्याअभावी सुकू लागली आहेत. मांदळेवाडी, वडगावपीर, लोणी, धामणी, पहाडदरा आणि शिरदाळे परिसरातील पिकांची अवस्था गंभीर झाली असून, महसूल व कृषी विभागाने प्रत्यक्ष शेतावर पाहणी करून नुकसानीचे पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

पूर्व आंबेगावातील जिरायती भागात खरीप हंगामात बाजरी, मका, भुईमूग, बटाटा, तूर, सोयाबीन, मूग आदी पिके घेतली जातात. यंदा पावसाने ओढ दिल्याने पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके सुकू लागली आहेत. शिरदाळे परिसरातील बटाटा उत्पादक शेतकऱ्यांना पावसाच्या खंडामुळे मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. लागवडीसाठी केलेला खर्च वाया जाण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

पावसाची परिस्थिती अशीच राहिल्यास आगामी काळात पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतीचे नुकसान, पाणीटंचाई आणि चाऱ्याची कमतरता अशा तिहेरी संकटाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागू शकतो.वडगावपीर येथील शेतकरी रमेश आदक पाटील, पहाडदरा येथील शेतकरी विनोद वायकर आणि शिरदाळे येथील शेतकरी जयदीप चौधरी यांनी प्रशासनाने तातडीने संयुक्त पथकाद्वारे पिकांची पाहणी करून पंचनामे करावेत आणि शासनाकडून आर्थिक मदत मिळण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे.

## विनर्स अकादमीची मिळकत आळंदी नगरपरिषदेने केली सील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** दिवेआगर येथे सहलीसाठी गेलेल्या आळंदीतील आठ विद्यार्थ्यांच्या दुर्दैवी मृत्यूच्या पार्श्वभूमीवर शहरातील कोचिंग क्लासेस व विविध आस्थापनांची पाहणी आळंदी नगरपरिषदेच्या वतीने सुरू आहे. या पाहणीदरम्यान आवश्यक परवानगी नसल्याचे निदर्शनास आल्याने विनर्स अकादमीच्या मिळकतीवर नगरपरिषदेने कारवाई करत ती सील केली.

नगरपरिषदेच्या पथकाने विनर्स अकादमीच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी श्री. नारायण हरिभाऊ दस यांच्या मालकीच्या मिळकतीमध्ये विनर्स अकादमी कोचिंग क्लासेस सुरू असल्याचे आढळून आले.

नगरपरिषदेच्या अभिलेखांची तपासणी केली असता संबंधित आस्थापनेने आवश्यक व्यवसाय परवाना अथवा ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे लागू कायदे व नियमांनुसार कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या आदेशानुसार कर विभाग प्रमुख सीमा चारवे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेच्या पथकाने विनर्स अकादमीची सदर मिळकत सील केली. या कारवाईवेळी पोलिस प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## शिरूर पोलिसांत २४ तासांत दोन लाचखोरीच्या कारवाया

**शिरूर :** शिरूर पोलीस ठाण्यातील दोन स्वतंत्र प्रकरणांत पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सलग कारवाई केली. एका हवालदाराला ११ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले, तर दुसरा हवालदार ९५ हजार रुपयांची लाच घेऊन पसार झाला. शिरूर पोलीस ठाण्यातील हवालदार शिवाजी ज्योतीराम बनकर याने गुन्ह्यात मदत करण्यासाठी आणि आरोपींना अटक न करता नोटीस देण्यासाठी १५ हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे.

३० सप्टेंबर रोजी ११ हजार रुपये स्वीकारताना एसीबीने त्याला पकडले. त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.दुसऱ्या प्रकरणात शिरूर पोलीस ठाण्यातील हवालदार सतीश नाथाराव मुंढे याने गुन्ह्यात मदत करण्यासाठी व अटक टाळण्यासाठी एक लाख रुपयांची मागणी केली. तडजोडीनंतर ९५ हजार रुपये स्वीकारताना एसीबीची कारवाई सुरू झाल्याचे लक्षात येताच मुंढे लाचेच्या रकमेसह पसार झाला.

त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.मुंढे याने लाच मागताना वरिष्ठांच्या नावाचा उल्लेख केल्याचे एसीबीच्या पडताळणीत समोर आल्याने या प्रकरणात वरिष्ठांची भूमिका काय, याबाबतही चौकशी होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी लाच मागणाऱ्या लोकसेवकांची माहिती १०६४ या टोल फ्री क्रमांकावर द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मंचरमध्ये पार्किंगमधून मोटारसायकल चोरी

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

**मंचर :** त्रिमूर्ती प्लाझा सोसायटीच्या पार्किंगमधून हिरो शाईन मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी मंचर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी शंकर महेंद्र शर्मा (वय ३५, व्यवसाय फर्निचर, रा. त्रिमूर्ती प्लाझा सोसायटी, मंचर) यांनी तक्रार दिली आहे. शर्मा यांनी २०२३ मध्ये नारायणगाव येथून जुनी हिरो शाईन मोटारसायकल खरेदी केली होती. तिचा क्रमांक एम.एच. १४ एच.टी. ०४११ असा आहे.२३ सप्टेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास त्यांनी मोटारसायकल सोसायटीच्या पार्किंगमध्ये हँडल लॉक करून लावली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता मोटारसायकल घेण्यासाठी गेले असता ती आढळून आली नाही. परिसरात शोध घेऊनही मोटारसायकल मिळून आली नाही. अज्ञात चोरट्याने हँडल लॉक तोडून सुमारे ३० हजार रुपये किमतीची मोटारसायकल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. मंचर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# गांधींचा सत्याग्रह विश्वमानवतेसाठी - डॉ. उल्हासदादा पवार

## डब्ल्यूपीयूमध्ये महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** संपूर्ण जग आज युद्धाच्या छायेत अस्वस्थ आहे. अशा वेळी गांधी जयंती ही संयुक्त राष्ट्रातर्फे जागतिक अहिंसा दिन म्हणून संपूर्ण जगात साजरी केली जाते, हे सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह हा मूलमंत्र गांधीजींनी दिला. गांधीजींचा सत्याग्रह हा विश्वमानवतेसाठी होता, असे विचार ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. उल्हासदादा पवार यांनी व्यक्त केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लाल बहादूर शास्त्री यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, माईर्स एमआयटी शिक्षण समूह व पीस विभागाच्या वतीने संत ज्ञानेश्वर मंडपात आयोजित स्मरण



महामानवांचे या अभिवादन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड होते.यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलसचिव प्रा. गणेश पोकळे, प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, एमआयटीचे वरिष्ठ सल्लागार डॉ. एस. एन. पठाण, प्रा. डॉ. मिलिंद पात्रे, डॉ. महेश थोरवे, लेखक अनिल जोशी, डॉ. विनोदकुमार जाधव, विष्णू भिसे, कर्नल तांदळे आणि बिपीन जोशी उपस्थित होते.

डॉ. उल्हासदादा पवार म्हणाले, गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाला प्राधान्य दिले. सर्वधर्मसमभाव आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा विचार समाजात रुजावा, तसेच भारतातील कोणताही समाज जाती आणि धर्माच्या आधारावर विभागला जाऊ नये, असा त्यांचा विचार होता. मानवता, समता व नैतिकता या तीन मूल्यांवर आधारित सत्याग्रहातून संघर्ष उभा करण्याचे तत्त्व न्या. रानडे यांनी गांधीजींना दिले. लाल बहादूर शास्त्री हे गांधीजींचे शिष्य होते.

शांतता, नम्रता आणि तत्त्वांप्रती निष्ठा ठेवून शास्त्रींनी देशसेवा केली. गांधी आणि शास्त्रींच्या विचारांची जाणीव ठेवून त्याच मूल्यांवर डॉ. विश्वनाथ कराड यांचे कार्य सुरू आहे.

विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, सत्य, अहिंसा आणि शांती हेच खरे मानवी जीवनाचे तत्त्व आहे. धर्मग्रंथ हेच खरे जीवनग्रंथ आहेत हे ओळखून गांधीजी सतत शांतीच्या मार्गाने वाटचाल करत राहिले. गांधींचा आणि बुद्धांचा देश म्हणूनच आज जगात भारताची ओळख आहे. आज जागतिक स्तरावर युद्धजन्य स्थितीत गांधीजींच्या सत्य, अहिंसा, प्रेम, शांती आणि विश्वमानवतेच्या विचारांची गरज आहे. सत्याचे सातत्य टिकवणारे सत्याग्रही महात्मा गांधी हेच आज विश्वशांतीचा आणि विश्वकल्याणाचा एकमेव विचार आहेत.डॉ. मिलिंद पांडे म्हणाले, या देशात गांधींच्याच विचारांची गरज आहे. एमआयटी वर्ल्ड पीस विद्यापीठात गांधीजींचे विचार अभ्यासक्रमात शिकवले जातात. वर्ल्ड पार्लमेंटच्या माध्यमातून हे विचार सर्वांपर्यंत पोहोचवत राहू.डॉ. एस. एन. पठाण म्हणाले, हिंदू-मुस्लिम भाईचारा देणारी ही व्यक्तिमत्त्वे होती. सर्वजण एकाच ईश्वराची लेकरे आहेत. नव्या पिढीला महात्मा गांधी सांगायला हवेत.विष्णू भिसे म्हणाले, गीतेचा सिद्धांत अध्यात्माच्या माध्यमातून गांधीजींनी कृतीत उतरवला. या देशात सत्य, अहिंसा आणि नैतिकतेचा पाया घातला. जगातील बलाढ्य देशही आज गांधीजींचे अनुयायी होऊ लागले आहेत.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मिलिंद पात्रे यांनी केले. डॉ. भागवत बिऱ्हाडी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. महेश थोरवे यांनी आभार मानले.

# ...तर ते उद्या गणपती मंडळाची निवडणूक लढवतील : आ. पवार

## उमेदवारी अर्ज खरेदीवरुन पवारांनी काढली शिंदेंची बौद्धिक पातळी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** राजकारणात सगळं आपल्यालाच मिळावं या हव्यासापोटी आपले विरोधक जिल्हा बँकच काय उद्या मतदारसंघात गणपती मंडळाची निवडणूक लागली तरी कायदा बदलत निवडणूक लढवू शकते असा घणाघात आमदार रोहित पवार यांनी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना सोशल मीडियावर लगावला. बुधवारी राम शिंदे यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज खरेदी केला होता. त्यावर आमदार पवारांनी राम शिंदेंना टोला लगावला. सोशल मीडियावरील या पोस्टने कर्जत-जामखेडमध्ये पुन्हा एकदा दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांमध्ये सोशल वार रंगला.

**आगामी काळात पवार-शिंदे वैर आणखी तीव्र झाल्यास मतदारसंघाचे नुकसान निश्चित**

विधानसभेच्या दोन्ही पंचवार्षिक निवडणुकीत राम शिंदे आणि रोहित पवार यांचे राजकीय वैर महाराष्ट्रास सर्वश्रुत आहे. मात्र दोन्ही राजकीय व्यक्तीमत्व वजनदार असल्याने त्यांनी आपल्या संविधानिक पदाचा वापर मतदारसंघाच्या विकासासाठी करावा. राजकारण आपल्या आपल्या ठिकाणी निश्चित करावे. पण राज्यात अशी अनेक उदाहरणे आहेत की मैत्रीपूर्ण राजकारणात त्या त्या भागाचा विकास करण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे मनात वैर न ठेवता जनतेच्या प्रश्नांवर काम करण्याचा सल्ला एका जेष्ठ व्यक्तीमत्वाने नाव न छापण्याच्या अटीवर दिला.

सध्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात देखील झाली. राम शिंदे यांच्या नावाचा कर्जत आणि जामखेड या दोन्ही तालुक्यात ठराव असून त्यांच्या राजकीय महत्वकांक्षेवरून त्यांनी जिल्हा बँक लढविण्याचे सूतोवाच केले होते. बुधवारी राम शिंदे यांनी स्वता जात आपल्यासाठी उमेदवारी अर्ज खरेदी केला होता. तोच धागा पकडत आमदार रोहित पवार यांनी गुरुवारी सकाळी आपल्या सोशल मीडियाच्या खात्यावरून राम शिंदेंना लक्ष्य केले. राजकारणात सगळं आपल्यालाच मिळावं या हव्यासापोटी तीन अपत्ये असताना



विधान परिषदेचे सभापती राम शिंदे अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेत. वास्तविक पाहता विधान परिषदेसारख्या कायदे-मंडळाच्या वरिष्ठ सभागृहाच्या सभापतींनाच कायदे-नियम माहित नसतील तर याला काय बोलावं

**रोहित पवारांच्या पोस्टने रंगला कार्यकर्त्यांमध्ये सोशल वार**

रोहित पवारांच्या वरील पोस्टने कर्जत-जामखेडच्या दोन्ही नेत्यांच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये चांगलाच सोशल वार सुरू झाला आहे. भाजपाचे जिल्हा सरचिटणीस शेखर खरमरे यांनी आमदार रोहित पवार यांची गत सध्या येऊ नको तर कोणत्या गाडीत बसू अशी झाली असल्याची टीका केली. तर राष्ट्रवादी काँग्रेस शपचे सुधीर यादव यांनी गणपती बाप्पा मोरया मंडळाच्या अध्यक्षपदी निवड कर्जत-जामखेड अशी पोस्ट टाकत चिमटा घेतला.

? असा सवाल उभा केला. खरं पाहता त्यांची बौद्धिक क्षमता मला माहित असल्याची बोचरी टीका केली.

कर्जत-जामखेडमध्ये केवळ मला विरोध करण्यासाठी आणि मतदारसंघात आपल्याला गुंतवून ठेवण्यासाठी त्यांना पद देण्यात आले आहे. हे कटू सत्य ते देखील नाकारणार नाहीत. पण त्या व्यक्तीस त्या पदाची गरिमा आणि साधे कायदे-नियम माहित नसणे याची शोकांतिका वाटते. अशा व्यक्तीला सभापती पदावरून तातडीने हटवून गणपती मंडळाच्या किंवा स्थानिक उत्सव मंडळाच्या निवडणुकीत सहभागी होण्यासाठी मुक्त करावं असा सल्ला दिला. जेणेकरून सभापती पदासारख्या प्रतिष्ठेच्या पदाची अप्रतिष्ठा आणि महाराष्ट्राचं नुकसान होणार नाही अशी मागणी भाजपाच्या वरीष्ठांना केली. एकतर सगळीकडेच राम शिंदे यांच्या नावाचाच झेंडा लावला जात असेल तर भाजपच्या कार्यकर्त्यांची अवस्थाही 'हाथ खाली और बजाओ ताली असा मिश्किल टोला देखील लगावला.

# निमगाव वाघात महात्मा गांधी जयंती उत्साहात



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निमगाव वाघा :** येथे ग्रामपंचायत कार्यालय, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी व स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महापुरुषांच्या विचारांचा जागर करत गावातील सार्वजनिक स्वच्छता, प्लास्टिकमुक्ती आणि व्यसनमुक्तीचा संकल्प करण्यात आला.

ग्रामपंचायत कार्यालयात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले. त्यानंतर ग्रामस्थांनी सार्वजनिक स्वच्छता राखणे, परिसर स्वच्छ ठेवणे, प्लास्टिकचा वापर टाळणे तसेच व्यसनांपासून दूर राहण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, किरण जाधव, दीपक जाधव, भगवंत केदार, भाऊसाहेब जाधव, अतुल फलके, सुरेश काळे, गणेश येणारे, नामदेव भुसारे, गोरख वाबळे, सोमनाथ आतकर आदी उपस्थित होते.

द•ख•ल



## सुधाकर आल्हाट यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**ढोरजळगाव :** श्रीराम माध्य व उच्च माध्य विद्यालय, ढोरजळगाव येथील उपक्रमशील शिक्षक सुधाकर मधुकर आल्हाट यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या शुभ हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. सुधाकर आल्हाट हे वाघोली ता.शेवगांव यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी एम.ए., बी.एड. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर एफ.डी.एल. शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षक म्हणून आपल्या सेवाकार्यास प्रारंभ केला. सुरुवातीच्या काळात आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव तसेच चापडगाव हायस्कूल, चापडगाव येथे त्यांनी अध्यापनाची जबाबदारी सांभाळली. सध्या ते श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ढोरजळगाव येथे अनेक वर्षांपासून ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सुधाकर आल्हाट यांचे संस्थेचे अध्यक्ष ड.शिवाजीराव काकडे, संस्थेच्या मार्गदर्शिका हर्षदाताई काकडे व संस्थेचे सर्व पदाधिकारी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांकडून अभिनंदन होत आहे.

## पिंगेवाडीचे देशपांडे उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने सन्मानित



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील पिंगेवाडी येथील रहिवाशी व सध्या फलटण येथे सार्वजनिक बांधकाम विभागात उपअभियंता म्हणून कार्यरत असणारे अजय देशपांडे यांना राज्य शासनाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट अभियंता पुरस्कार जाहीर होऊन त्याचे वितरण नुकतेच मुंबईमध्ये विधानभवनालगत असलेल्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजेभोसले यांच्यासह असंख्य राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या वतीने प्रत्येक वर्षी १५ सप्टेंबर रोजी भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यात सार्वजनिक विभागात उत्कृष्टपणे काम करणाऱ्या सार्वजनिक विभागाच्या अभियंत्यांना सदरचा पुरस्कार जाहीर करण्यात येऊन त्याचे वितरण होत. त्याचे वितरण नुकतेच मुंबईमध्ये झाले असून या वितरण सोहळ्यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्र राजेभोसले यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव शरद राजाभोग, आबासाहेब नागरगोजे,गिरीश वि.जोशी, राजेश भ. पाटील, राजेंद्र पा. निघोट,संतोष ग. शेलार,प्रधान मंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे सचिव प्रशांत शा.औटी या राज्यस्तरीय प्रमुख अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभ हस्ते वितरण करण्यात येऊन सन्मानित करण्यात आले आहे. देशपांडे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल शेवगाव तालुक्यातून विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

## राशीनच्या नवरात्रोत्सवासाठी प्रशासनाची नियोजन बैठक




**राशीन :** राशीन येथील श्री जगदंबा देवी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था तसेच विविध प्रशासकीय बाबींच्या नियोजनासाठी ५ /१०/२०२६ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता श्री जगदंबा देवी मंदिरात नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे. श्री जगदंबा देवी पब्लिक ट्रस्टच्या अर्जाच्या अनुषंगाने तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कर्जत रवि सात्वन यांनी संबंधित विभागांना बैठकीस उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. यंदाचा नवरात्रोत्सव ११ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणार आहे. उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून नियोजन करण्यात येणार आहे. बैठकीस गटविकास अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस विभाग, महावितरण, एसटी महामंडळ, आरोग्य विभाग, महसूल विभाग, ग्रामपंचायत तसेच श्री जगदंबा देवी पब्लिक ट्रस्टचे अध्यक्ष व पुजारी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# कन्हैय्या सोशल फौंडेशनतर्फे मॅरेथॉन स्पर्धा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** तालुक्यातील (ता.०४) ऑक्टोबर रोजी पहाटे पाच वाजता आयोजित करण्यात येणाऱ्या 'कन्हैय्या मॅरेथॉन २०२६' स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ऑफलाइन व ऑनलाइन नोंदणी मिळून आतापर्यंत सुमारे ८०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला असून,विविध वयोगटांतील महिला व पुरुषांचा त्यात समावेश आहे.

राळेगण सिद्धी ते पिंपळनेर या मार्गावर ही मॅरेथॉन होणार आहे. स्पर्धेच्या सुरक्षित व नियोजनबद्ध आयोजनासाठी मार्गाची पाहणी करून धावण्याचा मार्ग निश्चित करण्यात आला आहे. दिशादर्शक फलक,वाहतूक नियोजन तसेच स्पर्धकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

**मॅरेथॉनमधून आरोग्याचा संदेश : मच्छिंद्र लंके**

कन्हैय्या मॅरेथॉनच्या माध्यमातून युवकांसह सर्व वयोगटातील नागरिकांमध्ये आरोग्य, व्यायाम आणि शिस्तीची आवड निर्माण व्हावी, हा उद्देश आहे. स्पर्धेला मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक असून, भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचा प्रयत्न राहील.

स्पर्धेत १० किलोमीटर, ५ किलोमीटर आणि ३ किलोमीटर 'फन रन' असे तीन प्रकार ठेवण्यात आले आहेत.वयोगटानुसार तसेच महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र गट राहणार आहेत.प्रत्येक स्पर्धकाला क्रमांक,टी-शर्ट व पदक देण्यात येणार असून विजेत्यांना चषक देण्यात येणार आहेत.

स्पर्धेच्या मार्गावर वैद्यकीय पथक,डॉक्टर, रुग्णवाहिका, प्रथमोपचार पेटी, ओआरएस व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.तसेच वाहनतळ,छायाचित्रण,चित्रीकरण व अल्पोपाहाराची व्यवस्था केली जाणार आहे.

फिटनेस,आरोग्य, शिस्त आणि सामाजिक सहभागाचा संदेश देणारी ही मॅरेथॉन सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी कन्हैय्या सोशल फाउंडेशनच्या आयोजन समितीने तयारी सुरू केली आहे.बक्षिस वितरण माजी खासदार डॉ.सुजय विखे-पाटील,आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते होणार आहे.

# साकळाईवरील चर्चा गुलदस्त्यात का?

## पालकमंत्र्यांच्या श्रीगोंदा बैठकीचा तपशील जाहीर करण्याची संभाजी ब्रिगेडची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तालुक्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत गुरुवारी श्रीगोंद्यात झालेल्या टंचाई आढावा बैठकीत साकळाई उपसा सिंचन योजनेवर नेमकी काय चर्चा झाली? याचा तपशील अद्याप जाहीर न झाल्याने संभाजी ब्रिगेडने प्रशासनाला सवाल केला आहे.

बैठकीत दुष्काळ, पाणीटंचाई, चारा छावण्या, जलसंधारण, रोजगार हमी आणि पीक पंचनाम्यांबाबत झालेली चर्चा प्रसारमाध्यमांतून समोर आली. मात्र, श्रीगोंदा तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या साकळाई योजनेबाबत नेमके काय ठरले, यावर मात्र अधिकृत मौन का? असा सवाल संभाजी ब्रिगेडचे जिल्हा संपर्क प्रमुख इंजि. शामभाऊ जरे यांनी उपस्थित केला.

साकळाई योजनेची सद्यस्थिती, निधीची उपलब्धता, निविदा प्रक्रिया, प्रत्यक्ष काम सुरू करण्याची तारीख आणि काम पूर्ण करण्याची कालमर्यादा याबाबत बैठकीत चर्चा झाली असल्यास ती जनतेसमोर स्पष्ट करावी, अशी मागणी जरे यांनी केली आहे.

इतर विषयांवरील चर्चेची माहिती जाहीर होते; मग साकळाई योजनेबाबतचा तपशील गुलदस्त्यात का? योजनेबाबत नेमके काय ठरले, शासनाने ते स्पष्ट करावे, अशी मागणी जरे यांनी केली.

साकळाई योजनेबाबत अधिकृत माहिती जाहीर न झाल्यास शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासन व प्रशासनाने बैठकीतील निर्णय आणि पुढील कार्यवाही तातडीने जाहीर करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे.

# कॉलेजला जातो असे सांगून गेलेला जामखेडमधील तरुण बेपत्ता

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** घरून आष्टी येथील कॉलेजला जातो असे सांगून निघालेला अजय भारत खराडे हा तरुण गेल्या चार दिवसांपासून संशयास्पदरित्या बेपत्ता झाला आहे. आष्टी येथील महाविद्यालयात जातो म्हणून निघालेला हा तरुण घरी न पोहोचल्याने आणि त्याचा मोबाईल बंद असल्याने सर्वत्र चिंता व्यक्त केली जात आहे. याबाबत जामखेड पोलीस ठाण्यात मुलगा हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलीस व नातेवाईकांकडून त्याचा शोध सुरू आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अजय खराडे हा दि. २८ सप्टेंबर रोजी आष्टी येथील ड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयात परीक्षेसाठी गेला होता आणि परीक्षा संपवून सायंकाळी सुरक्षित घरी परतला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी, म्हणजेच मंगळवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास तो पुन्हा कॉलेजला जातो असे सांगून घरून निघाला. सकाळी अकरा वाजेच्या सुमारास पालकांनी त्याला संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याचा मोबाईल फोन स्विच ऑफ लागला. दुपारनंतरही फोन बंदच राहिल्याने पालकांनी काळजीपोटी थेट आष्टी गाठले.

अष्टी येथील कॉलेज परिसर, बस स्थानक आणि संभाव्य ठिकाणी नातेवाईकांनी शोध घेतला. महाविद्यालयातील शिक्षकांकडे व कर्मचाऱ्यांकडे चौकशी केली असता अजय त्या दिवशी कॉलेजमध्ये आलाच नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली. बस स्थानकापासून ते कॉलेजच्या मार्गावर अनेकांकडे चौकशी करूनही त्याचा कुठेही सुगावा लागला नाही.

अखेर सर्वत्र शोध घेऊनही मुलगा न सापडल्याने हवालदिल झालेल्या पालकांनी जामखेड पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने नोंद घेतली असून सर्व अंगांनी तपास सुरू केला आहे. मध्यम बांधा आणि निमगोरा रंग असलेल्या अजयचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्हा सहकारी बँकेच्या पारनेर सोसायटी मतदारसंघात विखे पाटील व थोरात कोणाला उमेदवारी देणार?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक लवकरच होत असून उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख दि.५ ऑक्टोबर असली तरी सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केलेले दोन नावे एक आ. काशिनाथ दाते व दुसरे माजी संचालिका व जी एस महानगर बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके यांचीच नावे चर्चेत असून ईतर विखे - थोरात गटाकडून कुणीही अर्ज भरले तरी ते माघारीसाठी असणार आहेत. दाते आणी श्रीमती शेळके यांची दोन नावे तालुक्यातील जनतेतून प्रामुख्याने चर्चेत आहेत.

विरोधी युतीचे उमेदवार खासदार नीलेश लंके हेच असल्याने सध्या दाते आणी शेळके यांच्याच नावावर चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे श्रीमती शेळके यांना सोसायटी मतदारसंघातील उमेदवारीची खात्री असल्याने त्यांनी महिला राखीव मध्ये अद्याप अर्ज दाखल न केल्याने उमेदवारी ताईंनाच मिळेल याची खात्री त्यांचे समर्थक कार्यकर्ते देत आहेत. आमदार काशिनाथ दाते सर यांचे समर्थक जिल्हा सहकारी बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड यांनी बिगरशेती मतदारसंघातून



उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तसेच सोनल गायकवाड यांनी महिला मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. जरी आपला पत्ता कट झाला तरी आपल्या समर्थकांना उमेदवारी ईतर मतदारसंघातून मिळेल याच अपेक्षेने ईतरांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

विखे - थोरात समर्थकांची संख्या तालुक्यात मोठी आहे. या युतीच्या जोरावर आपलाच उमेदवार निवडून येणार ही खात्री कार्यकर्त्यांना आहे. या निवडणुकीत भाजपचे मंडलाध्यक्ष राहुल शिंदे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांची भुमिका महत्वपूर्ण ठरणार आहे. मात्र उमेदवार कोण यावर सुजित झावरे पाटील निर्णय घेणार आहे. गेली अनेक वर्षांपासून झावरे - दाते यांचे राजकीय संबंध सर्वश्रुत आहे.

आ. दाते यांना उमेदवारी दिल्यानंतर झावरे पाटील काय निर्णय घेतात हे सांगण्याची गरज नाही. झावरे समर्थक मतदारांची संख्या दोन आकडी असल्याने त्यांचा निर्णय महत्वपूर्ण आहे. राहुल शिंदे हे माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांचे कट्टर समर्थक आहेत.

ते उमेदवारीच्या स्पर्धेत जरी असले तरी त्यांची उमेदवारी ही आमदार दाते यांना विरोध करण्यासाठी आहे.

दाते आणी श्रीमती शेळके यांच्यात उमेदवारी साठी स्पर्धा आहे मात्र यामध्ये शिंदे हे आमदार दाते यांच्या पेक्षा श्रीमती शेळके यांना उमेदवारी मिळण्यासाठी नामदार विखे यांच्याकडे प्रयत्न करतील. जी एस महानगर बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके या माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या भाची आहेत.

उदयदादा शेळके हे तीन पंचवार्षिक निवडणुकीत १२ वर्ष संचालक दोन वेळा उपाध्यक्ष व एक वेळी जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष होते.

तीनही पंचवार्षिक निवडणुकीत माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी पुढाकार घेतल्याने त्यांना संधी मिळाली. तसेच तिसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीत उदयदादा शेळके हे निवडणूक लढवीण्यासाठी अनुस्तुक होते मात्र त्यावेळी शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या सुचनेनुसार ते निवडणूक लढले व बँकेचे चेअरमन झाले. उदयदादा यांच्या निधनानंतर या रिक्त जागेवर त्यांच्या पत्नी श्रीमती गीतांजली शेळके या तीन वर्षांसाठी बिनविरोध निवडून आल्या.

गेली एक वर्षापूर्वी झालेल्या जी एस महानगर बँकेच्या निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखाली पॅनलच्या सर्व जागा विक्रमी मताधिक्याने निवडून आल्या. श्रीमती शेळके या जी एस महानगर बँकेच्या चेअरमन झाल्यानंतर बँकेच्या प्रगतीचा आलेख उंचावत गेला.

जिल्हा सहकारी बँकेत संचालिका पदावर काम करताना ताईंनी सर्वसामान्य शेतकऱ्यांना पाठबळ देण्याचे काम सातत्याने केले. सोसायटी मतदारसंघात ते जनतेच्या आग्रहाखातर लढत असून त्यांचीच उमेदवारी विखे - थोरात गटाकडून जाहीर होण्याची शक्यता कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत.

# रेव्हेन्यू कॅन्टीनमध्ये ग्रामीण शेतकऱ्यांची लूट?

## डबा खाल्ल्यास चार्ज; खाद्यपदार्थांच्या दरावरही प्रश्नचिन्ह; कोकाटे यांची चौकशीची मागणी

बाळासाहेब गदादे । राष्ट्र सह्याद्री

**चिचोंडी पाटील :** नगर तालुक्यातील ग्रामीण भागातून शासकीय कामांसाठी अहिल्यानगर शहरात येणाऱ्या शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांची रेव्हेन्यू कॅन्टीनच्या माध्यमातून कथित आर्थिक लूट होत असल्याचा आरोप पुढे आला आहे. घरून आणलेला डबा कॅन्टीनमध्ये खाल्ल्यास टेबल चार्ज आकारला जात असल्याची तक्रार असून, खाद्यपदार्थ व पेय पदार्थांच्या दराबाबतही पारदर्शकता नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण कारभाराची चौकशी करण्याची मागणी भाजपचे माजी तालुकाध्यक्ष तथा चिचोंडी पाटीलचे माजी सरपंच मनोज कोकाटे यांनी केली आहे.

रेव्हेन्यू कॅन्टीनमध्ये येणारे ग्रामीण भागातील नागरिक हे विविध शासकीय कामांसाठी ग्रामीण भागातून येतात. त्यामुळे खाद्यपदार्थांचे अधिकृत दर स्पष्टपणे दर्शविणे, योग्य दर आकारणे आणि त्यांना घरचा डबा खाऊन देणे हे गरजेचे आहे. कॅन्टीनच्या कारभाराची ताबडतोब चौकशी करून आवश्यक ती सुधारणा व्हावी अन्यथा लवकरच कॅन्टीनसमोरच जनआंदोलन केले जाईल.

**मनोज कोकाटे**

कोकाटे यांनी स्वतः या रेव्हेन्यू कॅन्टीनला भेट दिल्यानंतर काही बाबी निदर्शनास आल्याचे कोकाटे यांनी सोसायटीच्या चेअरमन यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. कॅन्टीनमध्ये खाद्यपदार्थांचे दर अधिक असल्याचे जाणवले; मात्र अधिकृत दरपत्रक अथवा भावफलक दर्शनी भागात



लावलेला दिसत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे.

कॅन्टीनमधील फलकावर चहाचा दर १५ रुपये असून, घरचा डबा आणून खाल्ल्यास प्रती व्यक्ती ३० रुपये टेबल चार्ज आकारण्यात येईल, अशी सूचना असल्याचे कोकाटे यांनी नमूद केले आहे.

या शुल्काला सोसायटीची मान्यता आहे का, त्याचा नियम काय आणि दर कोणत्या आधारावर निश्चित केला, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शनिवार दि.०३ ऑक्टोबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## भाडोत्री कार घेऊन चालकाला लुबाडले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नाशिकहून शिर्डीकडे जाण्यासाठी भाड्याने घेतलेल्या इर्टिगा कारच्या चालकाला कोयत्याचा धाक दाखवून मारहाण करत त्याचे हातपाय बांधून वांबोरी परिसरात सोडल्याची धक्कादायक घटना घडली. आरोपी कार आणि चालकाचा मोबाईल घेऊन पसार झाले. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात अज्ञात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोपान गोविंद दंडगुले (वय ३६, रा. दिघी, पुणे) हे इर्टिगा कार (एमएच १४ केएन ७७८३) चालक म्हणून चालवतात. ही कार उबेर कंपनीकडे नोंदणीकृत आहे. ३० सप्टेंबर रोजी दंडगुले भाडे घेऊन नाशिकला गेले होते. तेथून त्यांना शिर्डीचे भाडे मिळाले. रात्री सुमारे नऊ वाजता ते तीन प्रवाशांना घेऊन शिर्डीकडे निघाले. शिर्डीजवळ पोहोचल्यानंतर तिघांनी दंडगुले यांना कोयत्याचा धाक दाखवून शिवीगाळ व मारहाण केली. त्यांचे डोळे बांधून हातपाय बांधले आणि त्यांना कारच्या मागील सीटवर टाकले. त्यानंतर आरोपींनी त्यांना राहुरी तालुक्यातील वांबोरी परिसरात नेऊन रस्त्याच्या कडेला सोडले आणि कार व मोबाईल घेऊन पसार झाले. सकाळी दंडगुले यांनी पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा क्रमांक ११३३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९ (६), १४० (३), ३ (५) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# मुळा नदीवरील बंधारे भरण्यासाठी ११ मोऱ्यांतून पाणी सोडले

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा | वीजपुरवठा खंडित, पोलीस बंदोबस्त तैनात

**राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी चार दिवसांपूर्वी राहुरी येथे दुष्काळ परिस्थितीवर आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत त्यांनी तालुक्यातील शेतकरी, ग्रामस्थ आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून पाणीस्थितीची माहिती जाणून घेत शेतकऱ्यांच्या विविध अडचणी समजून घेतल्या होत्या. या पार्श्वभूमीवर मुळा नदीवरील बंधारे भरून देण्यासाठी मुळा धरणातून पाणी सोडण्याच्या सूचना त्यांनी पाटबंधारे विभागाला दिल्या होत्या. या आदेशानुसार काल सकाळी ९ वाजता मुळा धरणाच्या ११ मोऱ्यांतून मुळा नदीपात्रात २५०० क्यूसेकने पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली. त्यामुळे मुळा नदीवरील विविध बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यापूर्वीही शेतकऱ्यांच्या दुष्काळग्रस्त परिस्थितीवर आमदार प्राजक्त तनपुरे आणि आमदार अक्षय कर्डिले यांनी सुद्धा पाणी सोडण्याच्या भूमिकेवर प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. मुळा नदीपात्रात सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे डिग्रस, मानोरी, मांजरी आणि वांजुळपोई यासह नदीवरील परिसरातील बंधारे भरण्यास मदत होणार आहे. या बंधाऱ्यांमध्ये पाणी साठल्यानंतर नदीकाठच्या गावांतील पाणीस्थिती सुधारण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याबरोबरच शेती आणि पशुधनासाठी पाण्याची मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे नदीपात्रात पाणी उपलब्ध झाल्याने शेतकरी आणि पशुपालकांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. मुळा धरणातून नदीपात्रात पाणी सोडण्यात येत असल्याने प्रशासनाकडून सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक खबरदारी घेण्यात आली आहे. संबंधित परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला असून, नदीपात्र आणि आसपासच्या भागात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



नदीपात्रात अचानक पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी नदीपात्रात जाणे, नदी ओलांडणे अथवा पाण्याच्या प्रवाहाच्या जवळ जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, चार दिवसांपूर्वी राहुरी येथे झालेल्या दुष्काळ आढावा बैठकीत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तालुक्यातील पाणीस्थितीचा सविस्तर आढावा घेतला होता. यावेळी शेतकऱ्यांनी पाणीटंचाई, शेतीसाठी पाण्याची आवश्यकता आणि जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता यासह विविध अडचणी मांडल्या होत्या.

शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्यानंतर दुष्काळी परिस्थितीत उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याबरोबरच मुळा नदीवरील बंधारे भरण्यासाठी आवश्यक पाणी सोडण्याच्या सूचना जलसंपदा विभागाला देण्यात आल्या होत्या. त्यानुसार अवघ्या चार दिवसांत पाणी सोडण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. मुळा नदीपात्रात पाणी पोहोचल्यानंतर नदीवरील बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा वाढणार आहे. बंधाऱ्यांमध्ये पाणी साठल्यामुळे परिसरातील विहिरी, कूपनलिका तसेच इतर जलस्रोतांच्या पाणीपातळीत वाढ होण्यास मदत होण्याची शक्यता आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुळा नदीत सोडण्यात आलेले हे पाणी शेतकरी, पशुपालक आणि नदीकाठच्या गावांसाठी महत्त्वाचे ठरणार असून, आगामी काळातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी त्याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. जलसंपदा विभागाकडून पाणी सोडण्याची कार्यवाही सुरू झाल्यानंतर नदीकाठच्या गावांमध्ये आणि शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांना दुष्काळापासून किंचित असा दिलासा मिळाला आहे

## अज्ञात वाहनाच्या धडकेत तिघा भावंडांचा जागीच मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा - श्रीरामपूर रस्त्यावरील पुनतगाव फाटा येथे बुलेट व अज्ञात वाहनाच्या धडकेत नेवासा तालुक्यातील माळीचींचोरा येथील तिघा सख्ख्या भावाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी पावणे नऊच्या सुमारास घडली.



मृतांमध्ये आदित्य अंबादास आहिरे (वय १६), दिपक अंबादास आहिरे (१४) व चैतन्य अंबादास आहिरे (वय १२) रा. माळीचिंचोरा,ता. नेवासा यांचा समावेश आहे. या प्रकरणी दादासाहेब मुरलीधर आहिरे यांनी नेवासा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून नेवासा पोलिस ठाण्यात अज्ञात चलका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी आहे की अंबादास आहिरे यांनी घरगुती वापरासाठी बुलेट दुचाकी नुकतीच घेतली होती. गुरुवारी रात्री आदित्य,दीपक व चैतन्य हे तिघे भावंड सदर दुचाकीवर राहाता येथील नातेवाईकांकडे जात असताना नेवासा - श्रीरामपूर मार्गावरील पुनतगावफाटा येथे पावणे नऊच्या सुमारास अज्ञात वाहनासोबत त्यांच्या बुलेट गाडीचा अपघात झाला. अपघातानंतर अज्ञात वाहन घटना स्थळा वरून निघून गेले. गंभीर रित्या जखमी असलेल्या तिघांना नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेची माहिती मिळताच नेवासा पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली असून पुढील तपास सुरू आहे.सदर मृतदेह शवविच्छेदनानंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. शुक्रवारी शोकाकुल वातावरणात तिघा आहिरे भावंडावर माळीचिंचोरा येथे दफनविधी करण्यात आले.

## कॉँग्रेस, वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक आयोगाचा निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा तालुक्यात निवडूक आयोगाकडून राबविण्यात आलेल्या एसआईआर प्रक्रियेचा व निवडणूक आयोगाचा कॉँग्रेस व वंचित बहुजन आघाडीकडून जाहीर निषेध करण्यात आला. नुकतीच निवडणूक आयोगाकडून राज्यभर विशेष सखोल मतदार पडताळणी (एसआयआर) प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेमुळे अनेक मतदारांना आपल्या हक्काच्या मतदानाच्या अधिकारास मुकावे लागले आहे.



याला कारणीभूत असलेले फॉर्म सहा मधील बदलेले स्वरूप, मतदार यादीतून नावे वगळणे वा नोंदवणे एसआईआर प्रक्रियेतील याद्यांचे नवी दिल्लीत होत असलेले केंद्रिकरण. याविषयीं आयोगामध्ये असलेले मतभेद अशी अनेक कारणे कारणीभूत ठरली आहे.नेवासा तालुक्यात देखील गेल्या सहा महिन्यापासून एसआईआर प्रक्रिया राबविली जात आहे. विशेष म्हणजे यामध्ये तब्बल वीस हजार पाचशे नावे कायमस्वरूपी वगळण्यात आली तर एकोणीस हजार सातशे पन्नास हयात असलेल्या मतदारांना बीएलओ कडून नावे वागळण्याच्या व कागदपत्र पूर्ततेच्या नोटीशा देण्यात आल्या.

यामुळे या मतदारांची मोठी धावपळ उडाली आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेसचे संभाजी माळवदे यांच्या नेतृत्वात नेवासा तहसीलदार व निवडूक अधिकारी यांची भेट घेऊन ज्या मतदारांना नोटीसा दिल्या त्यांना कोणत्याही अटीशिवाय तातडीने यादीत समाविष्ट करून घेण्यात यावे. अशी मागणी करण्यात आली. तातडीने समावेश न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा ईशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी सरकारने राबविलेल्या प्रक्रियेचा तसेच निवडणूक आयोगाचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी कॉँग्रेस शहराध्यक्ष अंजुम पटेल, वंचित बहुजन आघाडीचे महासचिव गणपत मोरे, अध्यक्ष पोपट सरोदे,कैलास बोर्डे, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे इरफान शेख, संदीप क्षीरसागर,संदीप केंदाळे आदिसह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी अंजुम पटेल यांनी अल्पसंख्याक समाजाला टार्गेट केले जात आहे त्यांचा अधिकार हिरवण्याचे पाप मोदी सरकार करत आहे त्यामुळे आता जागरूक होण्याची वेळ आली आहे असे स्पष्ट केले.

यावेळी नेवासा निवडणूक अधिकाऱ्यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले.

### मूलभूत अधिकार ठरवण्याचा प्रयत्न

नेवासा तालुक्यात २० हजार नावे कायमस्वरूपी वगळणे, व २० हजार मतदारांना जे हयात आहे त्यांना वगळण्याच्या नोटीसा देणे ही अत्यन्त गंभीर बाब आहे. मतदान करणे मूलभूत अधिकार असून त्याला हिरावून घेणे आयोगाचा अधिकार नाही. याविरोधात मोठे जण आंदोलन उभारणार.

**- संभाजी माळवदे.**

## हौसेनं घेतलं केंद्रप्रमुख पद; आता म्हणतात, 'नको रे बाबा..!'

### काटेरी मुकुट ठरले केंद्र समन्वयक पद; २० हून अधिक नव्या केंद्रप्रमुखांची पदावनतीची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : मोठ्या उत्साहाने, मेहनतीने आणि परीक्षेत यश मिळवून केंद्रप्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारली; मात्र प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्यानंतर या पदाचे वास्तव समोर आल्याने अनेक नव्या केंद्रप्रमुखांचा भ्रमनिरास झाल्याची चर्चा जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागात सुरू आहे. कामाचा वाढता ताण, सततची माहिती मागणी, वरिष्ठांचे तातडीचे आदेश आणि शाळांकडून माहिती संकलित करताना येणाऱ्या अडचणींमुळे जिल्ह्यातील २० हून अधिक नव्या केंद्रप्रमुखांनी पदावनती करून पुन्हा शिक्षक म्हणून काम करण्याची इच्छा व्यक्त केल्याचे समजते.

मागील काही वर्षांत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि पदवीधर विस्तार अधिकारी यांच्या पदोन्नत्या झाल्या. त्याचबरोबर सरळसेवा भरतीच्या माध्यमातून परीक्षा उत्तीर्ण झालेल्या अनेक तरुण शिक्षकांना केंद्रप्रमुख म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे शिक्षण विभागाच्या प्रशासकीय रचनेला बळ मिळाल्याचे चित्र निर्माण झाले. मात्र, पद मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाचा ताण अपेक्षेपेक्षा अधिक असल्याचे काही केंद्रप्रमुखांचे म्हणणे आहे. केंद्रप्रमुखांच्या म्हणण्यानुसार, वरिष्ठ कार्यालयाकडून कोणत्याही वेळी फोन किंवा संदेशाद्वारे माहिती मागवली जाते. 'तातडीने माहिती द्या', 'विलंब झाल्यास कार्यवाही होईल', अशा सूचनांमुळे मानसिक दबाव निर्माण होतो. वरिष्ठांकडून आलेली माहिती केंद्रातील प्रत्येक शाळेपर्यंत पोहोचवणे, त्यानंतर संबंधित शाळांकडून माहिती संकलित करणे आणि ती एकत्रित करून वेळेत वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवणे, हे काम अनेकदा कसरतीचे ठरते.

विशेषतः एखाद्या केंद्रातील एकाही शाळेने माहिती वेळेत न दिल्यास संपूर्ण केंद्राची माहिती रखडते. काही मुख्याध्यापकांकडून आदेशांची अपेक्षित गतीने अंमलबजावणी होत नसल्याने त्याचा परिणाम केंद्रप्रमुखांवर होतो, अशीही तक्रार आहे. शिक्षक म्हणून वर्गात अध्यापन करणे आणि केंद्रप्रमुख म्हणून प्रशासनाची जबाबदारी सांभाळणे यात मोठा फरक आहे. केंद्रप्रमुखांना अध्यापनाबरोबरच प्रशासकीय कामकाज, अहवाल, विविध उपक्रमांची माहिती, शाळांच्या भेटी आणि वरिष्ठांकडून येणाऱ्या सततच्या सूचनांचा सामना करावा लागतो. त्यामुळे 'पद मिळवताना आनंद झाला; पण आता शिक्षक म्हणूनच काम करणे बरे', अशी भावना काही नव्या केंद्रप्रमुखांमध्ये निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे शासनाने केंद्रप्रमुख पदाचे नामकरण 'केंद्र समन्वयक' असे केले असले तरी प्रत्यक्ष जबाबदाऱ्या कमी झालेल्या नाहीत. उलट समन्वय साधताना अनेक अडचणी येत असल्याने हे पद काही जणांसाठी 'काटेरी मुकुट' ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे. पदाचा वाढता ताण पाहता २० हून अधिक केंद्रप्रमुखांनी पदावनतीसाठी जिल्हा परिषदेकडे अर्ज केल्याची माहिती आहे. मात्र पदावनतीची प्रक्रिया देखील सहज होत नसल्याने संबंधितांची कोंडी झाली आहे. त्यामुळे 'हौसेने पद घेतले; आता सोडायचे म्हटले तरी अडचण', अशी त्यांची अवस्था झाल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, पदोन्नती आणि पदावनतीच्या प्रक्रियेत नियमांचे पालन व्हावे आणि कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराला वाव राहू नये, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे. शिक्षण व्यवस्थेतील महत्त्वाच्या पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना केवळ आदेश देण्याऐवजी आवश्यक मनुष्यबळ, स्पष्ट कार्यपद्धती आणि प्रशासकीय सहकार्य मिळणे गरजेचे असल्याची भावना व्यक्त होत आहे.

पद मिळवण्यासाठी धडपड, पद सांभाळताना कसरत आणि पद सोडण्यासाठीही संघर्ष, अशा त्रिसंकटात सापडलेल्या नव्या केंद्रप्रमुखांचा हा अनुभव शिक्षण विभागातील प्रशासकीय व्यवस्थेवर गांभीर्याने विचार करण्यास भाग पाडणारा ठरत आहे.

## नेवासा येथे १ मिनिट ३० सेकंदात ज्ञानेश्वरी वाचनकरून ज्ञानेश्वरी जयंती साजरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : जेथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी जन्माला आली अशा पुण्यभूमी व संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी तीर्थक्षेत्र नेवासा येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरीची शोभायात्रा काढून तसेच संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणात ग्रंथराज ज्ञानेश्वरीतील ९ हजार ३३ ओव्या हया यावर्षी १ मिनिट ३० सेकंदामध्ये सामूहिक वाचनाद्वारे पूर्ण करण्यात आल्या.ओम आकाराच्या ठेवण्यात आलेले दीप पेटविण्यात येऊन दीपोत्सवाने ज्ञानेश्वरी जयंती साजरी करण्यात आली. माऊली माऊलीज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषाने नेवासेनगरी दुमदुमली होती.




यावेळी संत ज्ञानेश्वर माऊलींसह ज्ञानेश्वरीची सामूहिक आरती गाऊन पसायदानाने सांगता करण्यात आली. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त मंडळी,विविध क्षेत्रातील संत मंडळी, कान्हेगाव, पढेगाव, दत्त शिंगवे, भेंडे, सोनई यांच्यासह इतर तालुक्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**छाया-सुधीर चव्हाण नेवासा**

सन २०२६ या वर्षाची श्री संत ज्ञानेश्वर महाराज कृत ७३५ व्या व श्री संत एकनाथ महाराज संशोधित ४४२ व्या ज्ञानेश्वरी जयंती निमित्ताने २ ऑक्टोबर रोजी दुपारी ठीक ३ ते ५ या वेळेत नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरापासून ग्रंथराज ज्ञानेश्वरीची सजविण्यात आलेल्या रथातून शोभायात्रा दिंडी मिरवणूक काढण्यात आली. या दिंडीत महिला पुरुष युवक युवती बाळ गोपाळ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सायंकाळी झालेल्या दीपोत्सव प्रसंगी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के, भेंडे येथील रामेश्वर महाराज कंठाळे,अध्यक्ष पांडुरंग अभंग, ज्ञानेश्वर माऊली शिंदे, शुभम महाराज कांडेकर,रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात, गहिनीनाथ महाराज आढाव, चांगदेव महाराज काळे, गणेश महाराज आरगडे, ज्ञानेश्वर माऊली शिंदे, कोंडीराम महाराज पेचे,बाळकृष्ण महाराज कुलकर्णी, नवनाथ महाराज आगळे, गंगाधर महाराज गाडेकर,अशोक महाराज नरवडे,भाऊसाहेब महाराज वीर, काशिनाथ अण्णा नवले, विश्वस्त कृष्णा महाराज पिसोटे यांच्या हस्ते दीप पेटविण्यात आले.

ह भ प देविदास महाराज म्हणाले, ज्ञानेश्वरी ही संत ज्ञानेश्वर महाराजांचेच प्रतीक रूप आहे जसे परीस स्पर्शाने लोखंडाचे सोने होते त्याच प्रमाणे माऊलींचा पैसखांब हा परीस असल्याने आपल्या जीवनाचे पैस चरणी नतमस्तक झाल्यावर सोने झाल्याशिवाय राहणार नाही.

## शॉर्ट सर्किटमुळे देवळाली प्रवरात ऊस जळून खाक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील राहुल हरिभाऊ महांकाळ यांच्या शेतातील चार एकर ऊस वीजेच्या शॉर्टसर्किटमुळे जळून खाक झाल्याची घटना १ ऑक्टोबर रोजी घडली. या आगीत महांकाळ यांच्या ऊस पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.



देवळाली प्रवरा येथील गट नंबर १५५१/६ मध्ये राहुल महांकाळ यांची शेती आहे. शेतातून गेलेल्या वीजवाहिनीमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने ठिणग्या पडून ऊस पिकाला आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केल्याने जवळपास चार एकर क्षेत्रातील ऊस जळून खाक झाला.

आगीची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, ऊस पिक कोरडे असल्याने आग वेगाने पसरली.

या घटनेत शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, संबंधित विभागाने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा करावा तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासनाच्या नियमानुसार मदत मिळावी, अशी मागणी होत आहे.